पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

सोमवार, दि. ०८ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०४५ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com


आतील पानात...


३ केडगावमध्ये अवैध गर्भपाताचा मोठा पर्दाफाश

४ स्वस्तात सोने देण्याचे आमिष; लुटारू टोळीचा पर्दाफाश

५ छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



पान ८ वर..




# १५ जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी, घाईघाईने पेरणी न करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**बळीराजाची चिंता वाढली**

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यातील बळीराजा ज्या मान्सूनच्या पावसाची चातकासारखी वाट पाहत आहे, त्याबाबत आता एक चिंताजनक वृत्त समोर आले आहे. मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असला, तरी किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर आणि मान्सूनच्या प्रगतीचा वेग मंदावण्याची शक्यता हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजावरून वर्तवण्यात आली आहे. परिणामी, आगामी आठवडाभरात राज्यात सर्वत्र समाधानकारक पाऊस होण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. या पार्श्वभूमीवर, कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकऱ्यांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनने दक्षिण कोकणात प्रवेश केला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, कोकणातील या आश्वासक सुरुवातीनंतर मान्सूनची पुढील वाटचाल काहीशी थंडावणार आहे.

सध्याच्या हवामान स्थितीनुसार, १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये केवळ दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन विखुरलेल्या स्वरूपात मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडू शकतो. तथापि, हा पाऊस अत्यंत मर्यादित क्षेत्रापुरता मर्यादित राहणार असल्याने, व्यापक क्षेत्रात पेरणीसाठी तो पोषक ठरेल



अशी परिस्थिती अद्याप निर्माण झालेली नाही.

एकीकडे मान्सून लांबणीवर पडत असताना, दुसरीकडे किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमधील कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च पातळीवर राहण्याचा अंदाज आहे. विदर्भआणि खानदेश या भागांत उन्हाचा चटका कायम राहणार असून कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातही नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागणार असून, येथील तापमान ३५ ते ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे.

मान्सूनपूर्व आणि वादळी पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची नियमावली जारी केली आहे.

पेरणीची घाई करू नये: आगामी काळात होणारा वादळी पाऊस हा स्थानिक स्वरूपाचा आणि तात्पुरता असू शकतो. त्यामुळे केवळ या पावसावर अवलंबून राहून शेतकऱ्यांनी पेरणीची अजिबात घाई करू नये. पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे वाया जाऊन दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.

विजांपासून संरक्षण करा: दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसात विजा पडण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे विजांच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि हायव्होल्टेज विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे पूर्णपणे टाळावे, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

एकंदरीत, मान्सूनचे आगमन झाले असले तरी राज्याला सर्वदूर आणि दमदार पावसासाठी अजून काही दिवस वाट पाहावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामान अंदाजाचा अचूक कानोसा घेऊनच पुढील पावले उचलावीत.

## संक्षिप्त

### राज्यसभा जागेवरून राष्ट्रवादी पेचात;

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर कुणाची नियुक्ती होणार, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. ही जागा अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या कोट्यातील असल्याने पक्षापुढे अनेक राजकीय पर्याय उभे ठाकले आहेत. त्यामुळे आगामी नियुक्ती केवळ एका खासदाराची निवड न राहता पक्षातील सत्ता समीकरणे आणि भविष्यातील राजकीय रणनीती ठरवणारी ठरू शकते. राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांचे नाव राज्यसभेसाठी सर्वाधिक चर्चेत आहे. भाजपमधील एका प्रभावी गटाकडून भुजबळ यांच्या नावाला पाठबळ दिले जात असल्याची चर्चा आहे. भुजबळ यांना दिल्लीच्या राजकारणात सक्रिय भूमिका देण्यामागे महायुतीचे व्यापक राजकीय गणित असल्याचे मानले जात आहे. भुजबळ राज्यसभेत गेल्यास राष्ट्रवादीच्या कोट्यातील एक मंत्रीपद रिक्त होणार आहे. त्या जागेसाठी माजी खासदार समीर भुजबळ यांचे नाव पुढे येत असून, भुजबळ कुटुंबाकडून त्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दरम्यान, माजी मंत्री धनंजय मुंडे हे देखील रिक्त होऊ शकणाऱ्या मंत्रीपदासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे राज्यसभा आणि मंत्रीपद या दोन्ही स्तरांवर राष्ट्रवादीत नवे सत्तासमीकरण तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे पक्ष नेतृत्वासमोर संतुलन साधण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. राज्यसभेसाठी पक्षाचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक यांचे नावही चर्चेत आहे. पक्षाचा राष्ट्रीय विस्तार आणि दिल्लीतील संघटनात्मक उपस्थिती मजबूत करण्यासाठी आदिक यांना संधी देण्याचा विचार काही नेत्यांकडून पुढे केला जात असल्याचे समजते. राष्ट्रवादीला राष्ट्रीय पातळीवर अधिक प्रभावी बनवण्याच्या दृष्टीने हा पर्याय महत्त्वाचा मानला जात आहे.

### काँग्रेसचा बडा नेता शिंदेसेनेच्या गळाला

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : विधान परिषदेच्या निवडणुकीत उमेदवारी देऊनही ऐनवेळी माघार घेणाऱ्यांवर काँग्रेसने मोठी कारवाई केली आहे. यवतामळमधून उमेदवारी मिळालेले साहेबराब कांबळे यांनी संख्याबळ नसल्याचे सांगत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यांच्या निर्णयानंतर काँग्रेसने त्यांना पक्षातून निलंबीत केले.

साहेबराव यांची काँग्रेसमधून हकालपट्टी होताच एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून मोठा निर्णय घेण्यात आला. साहेबराब कांबळे यांना शिंदेंनी आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे.

## 'प्रोजेक्ट एक्स' हाऊस पार्टीवर क्राईम ब्रँचची रेड; तरुण-तरुणी पोलिसांच्या ताब्यात

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : आळंदी–मरकळ रस्त्यावरील एका बंगल्यात मध्यरात्री सुरू असलेल्या हाय–प्रॉफाईल पार्टीवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शनिवारी रात्री उशिरा छापा टाकला. लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुळापूर परिसरात ही कारवाई करण्यात आली. या पार्टीला प्रोजेक्ट एक्स असे नाव देण्यात आले होते. या छाप्यात सुमारे १०७ पुरुष आणि ४९ महिला उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारच्या रात्री तुळापूर येथील एका बंगल्यात मोठ्या प्रमाणावर तरुण–तरुणी एकत्र जमल्याची आणि तिथे अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. माहिती मिळताच क्राईम ब्रँचच्या १५ अधिकारी आणि ६५ हवालदारांच्या पथकाने मध्यरात्रीच्या सुमारास या बंगल्याला वेढा घातला आणि अचानक छापा टाकला.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचा वापर झाल्याचा तीव्र संशय आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून नशेसाठी वापरले जाणारे काही संशयास्पद पदार्थ जप्त केले आहेत. तसेच, पार्टीत उपस्थित असलेले काही तरुण–तरुणी पोलिसांना नशेच्या अवस्थेत आढळून आले. याशिवाय, राज्य उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही परवानगी न घेता तिथे विनापरवाना मद्यविक्री सुरू होती, तसेच हाय–डेसिबल साऊंड सिस्टिमचा वापर करून मध्यरात्रीपर्यंत धांगडधिंगा सुरू होता.

## बस सुरक्षेसाठी नवे नियम लागू; प्रमाणीकरण प्रक्रिया होणार सुलभ

### एआरएआय'चा विशेष कक्ष सुरू; बस उत्पादकांचा वेळ आणि खर्च वाचणार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून देशभरात बससाठी नवीन सुरक्षा नियमावली लागू करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार बस उत्पादक कंपन्यांना नवीन बसचे उत्पादन करावे लागणार आहे. तसेच नवीन बसचे प्रमाणीकरणही करून घ्यावे लागणार आहे. यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे.

याअंतर्गत प्रवासी बसच्या बांधणीचे प्रमाणीकरण करण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचे पाऊल ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया'ने (एआरएआय) उचलले आहे. यासाठी विशेष




कक्ष सुरू करण्यात आला असून, त्यामुळे बस उत्पादक कंपन्यांचा या प्रक्रियेचा वेळ वाचणार आहे. याचबरोबर यासाठी कंपन्यांना येणारा लाखो रुपयांचा खर्च निम्म्याने कमी होणार आहे.

बस उत्पादक कंपन्यांना बसच्या बांधणीच्या प्रमाणीकरणासाठी एआरएआय'ने सुरु केलेल्या विशेष कक्षाच्या माध्यमातून कंपन्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्यासह इतर बाबींबाबत मार्गदर्शन केले जात आहे. बसच्या बांधणीच्या प्रमाणीकरणामध्ये त्रिस्तरीय नियामक चौकट असून, त्यात बसची व्हिडिओ तपासणी आणि प्रत्यक्ष सुरक्षा उपाययोजनांची तपासणी यांचा समावेश आहे. बसच्या प्रमाणीकरणासाठी एआरएआय'ने यासाठी आपल्या संकेतस्थळावर ऑनलाइन सुविधा सुरू केली आहे.


अर्ज करण्यापूर्वीच्या टप्प्यापासून एआरएआय'चे पथक कंपन्यांना मदत करीत आहे. बसच्या बाह्य भागाचा विकास करताना तांत्रिक आणि रचनात्मक पाठबळ हे पथक देईल. यामुळे प्रमाणीकरणाची प्रक्रिया जलद होण्यास मदत होणार आहे. देशात प्रवासी सुरक्षा डोळ्यासमोर ठेवून बसच्या बाह्य भागासाठी नियमावली लागू करण्यात आली. बसची बांधणी करताना योग्य मानकांचा वापर बस उत्पादक कंपन्यांनी करावा आणि त्या गुणवत्तेचे एकसमान निकष असावेत, हा यामागील हेतू आहे.

## कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर अपघातात युवक ठार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : कल्याण–अहिल्यानगर महामार्गावरील करंजाळे गावाजवळ रविवारी (दि. ७ जून) सकाळी भीषण अपघात घडला. हॉटेल छत्रपतीसमोरील धोकादायक वळणावर पिकअप वाहन आणि दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत खानगाव येथील एका युवकाचा जागीच मृत्यू झाला.

माहितीनुसार, एमएच १४ केए ४२७७ क्रमांकाच्या पिकअप वाहनावरील चालकाचा ताबा सुटल्याने वाहन भरधाव वेगाने समोरून येणाऱ्या एमएच १४ ईजे ७८६३ क्रमांकाच्या दुचाकीवर आदळले. धडकेची तीव्रता



इतकी जबरदस्त होती की दुचाकीस्वार सुमारे ५० फूट अंतरापर्यंत फरफटत गेला. अपघातानंतर पिकअप वाहनही पलटी झाल्याचे सांगण्यात आले.

या दुर्घटनेत रामदास दशरथ घोगरे (वय ४०, रा. खानगाव, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमी अवस्थेत घोगरे यांना रुग्णवाहिकेद्वारे जुन्नर येथील रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही वाहने ताब्यात घेत पंचनामा केला असून अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे. दरम्यान, करंजाळे परिसरातील या धोकादायक वळणावर वारंवार अपघात होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तातडीने सुरक्षा उपाययोजना, इशारा फलक आणि वेगनियंत्रण यंत्रणा बसविण्याची मागणी केली आहे.

## प्रेमप्रकरणातील त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : प्रेमप्रकरणातून त्रास दिल्याने तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कोरेगाव पार्क भागात घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल भैरम काळे (वय २१, रा. हुडको कॉलनी, शिरुर, जि. पुणे) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे.

याबाबत विशाल काळे याच्या बहिणीने कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. काळे याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन चैत्राली ऊर्फ चैतू चंदू भोसले, रोहित चंदू भोसले, ऋषिकेश चंदू भोसले, कोला काळूराम काळे आणि परशान काळूराम काळे (सर्व सध्या रा. कोरेगाव पार्क सिग्नलजवळ, मूळ रा. हुडको कॉलनी, शिरुर, जि. पुणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेल्या २३ वर्षीय तरुण आणि आरोपी हे नातेवाईक आहे. कोरेगाव पार्क परिसरातील सिग्नलजवळ थांबून ते फुले, तसेच किरकोळ वस्तूंची विक्री करतात. तरुणाचे एका तरुणीशी प्रेमसंबंध होते. या कारणावरून आरोपींनी त्याला त्रास दिला होता. आरोपींनी त्याच्याकडे पैशांची मागणी केली होती.

## अखेर तुळजाभवानी देवीचा मुकुट सापडला; दोघे जेरबंद

जनप्रवास । प्रतिनिधी

पिंपरी : तळेगाव दाभाडे येथील जिजामाता चौकातील तुळजाभवानी मंदिरातून भरदिवसा चोरीला गेलेल्या देवीच्या सुमारे सव्वा किलो वजनाच्या चांदीच्या मुकुटाचा अखेर उलगडा करण्यात तळेगाव दाभाडे पोलिसांना यश आले. या प्रकरणी दोन संशयितांना अटक केली असून, चोरीस गेलेला १.३०० किलो वजनाचा चांदीचा मुकुट जप्त करण्यात आला आहे. सीसीटीव्हीत कैद झालेल्या चोरट्याचा माग काढत पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत गुन्हा उघडकीस आणला. रवी जटाशंकर सोनी (वय ३४, रा. कुदळवाडी, चिखली; मूळ रा. उत्तर प्रदेश) आणि रमेश श्रीराम सोनी (वय ३६, रा. हिंजवडी फेज २, बोडकेवाडी; मूळ रा. उत्तर प्रदेश), अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

## अराजकवाद्यांचे चेहरे उघडे पडले

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'कॉक्रोज' पार्टीवर टीका

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : जंतर मंतरवर आंदोलन करणाऱ्यांचे अराजकतावादी चेहरे आणि मनसुबे उघडे पडले आहेत. असे इरादे कधीही यशस्वी होणार नाहीत. तसेच त्यांना कुठलंही समर्थन मिळालेलं नाही, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

अमेरिकेतून परतलेल्या अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली कॉक्रोज जनता पार्टीने आजपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरू केलेल्या आंदोलनाने देशभरातील राजकीय वर्तुळाचं लक्ष वेधून घेतलं आहे. सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या तरुणाईसह विरोधी पक्षांमधील अनेक नेतेही या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. दरम्यान,



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉक्रोज जनता पार्टीच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तसेच जंतर मंतरवर आंदोलन करणाऱ्यांचे अराजकतावादी चेहरे आणि मनसुबे उघडे पडले आहेत. असे इरादे कधीही यशस्वी होणार नाहीत. तसेच त्यांना कुठलंही समर्थन मिळालेलं नाही, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

जंतर मंतर येथे आंदोलन करत असलेल्या कॉक्रोज जनता पार्टीबाबत प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज तुम्ही सर्वांनी जंतर मंतर येथे पाहिलं असेल की, तिथे भाषणं झाली, घोषणाबाजी करण्यात आली. त्यामधून एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे ही भारताच्या तरुणांची अभिव्यक्ती नाही तर ती अराजकता पसरवण्याच्या मानसिकतेची अभिव्यक्ती आहे. तो अराजकतेचा मंच आहे हे स्पष्ट झालं आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान हातात घ्यायंच आणि त्याच संविधानाने तयार केलेल्या संस्थांना नाकारायच्या. त्याच संविधानाने तयार केलेली व्यवस्थाच उखडून टाकण्याबाबत बोलायचं. तसेच अराजक निर्माण व्हावं याची कामना करायची. या अभिव्यक्तीमुळे त्यांचे अराजकतावादी चेहरे आणि मनसुबे उघडे पडले आहेत. असे इरादे कधीही यशस्वी होणार नाहीत.

## 'सत्ताधाऱ्यांना राजकीय किंमत मोजावी लागेल': शरद पवारांचा इशारा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : वाढती महागाई नियंत्रणात ठेवण्यात सरकारला अपयश येत आहे. पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीनंतर आता घरगुती सिलिंडरच्या दरातदेखील मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारवर टीका करण्यात येत आहे. दरम्यान, शरद पवार यांनी देखील सरकारचे कान टोचले आहेत.



'सातत्याने दर वाढत आहेत. या सगळ्याचा परिणाम सामान्य माणसाच्या प्रपंचावर होतोय. आम्ही महागाईवर नियंत्रण ठेवतोय, असे पंतप्रधान सातत्याने सांगतायेत. नियंत्रण म्हणजे टप्याटप्याने झटका द्यायचा, याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी कळेल.', असा इशारादेखील शरद पवारांनी दिला. पेट्रोल डिझेलच्या दरात वाढ केल्यानंतर आता घरगुती सिलिंडरच्या दरात देखील सरकारने २९ रुपये वाढ केली आहे. या दरवाढीमुळे सामान्य माणसांचे बजेट कोसळणार आहे. गेल्या तीन महिन्यांत घरगुती सिलिंडरच्या दरात ही दुसऱ्यांदा झालेली वाढ आहे. महागाईला नियंत्रणात ठेवण्यासाठी आरबीआयकडून रेपो दर जैसे थे ठेवण्यात आले आहेत. मात्र, आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम भारतावर होतो आहे. अमेरिका आणि इराकमधील युद्ध अजून थांबलेले नाही. त्यामुळे इंधनाची सुरळीत पुरवठा होण्यास अडचण येत आहे. त्यामुळे इंधनाचे दर भडकले असल्याचे सांगितले जात आहे.

# अग्रलेख : महाराष्ट्रात मान्सून आगमनाची आनंदवारी

देशभरातील नागरिकांना प्रतीक्षा असलेला नैऋत्य मान्सून अखेर केरळ, गोवामार्गे महाराष्ट्रत दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) अधिकृतपणे केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याची घोषणा केली आहे. गत काही दिवसांपासून मान्सूनच्या आगमनाबाबत विविध अंदाज व्यक्त केले जात होते. सुरुवातीला २६ मे रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचेल, असा अंदाज होता. त्यानंतर १ किंवा २ जूनपर्यंत आगमन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र, काही दिवसांचा विलंब झाल्यानंतर अखेर ४ जून रोजी मान्सून केरळमध्ये तर गोवामार्गे महाराष्ट्रत शनिवारी तळकोकणात दाखल झाला. हवामानतज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि अरबी समुद्रातील सक्रिय मोसमी वा–यांमुळे मान्सूनच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ढगांची घनता वाढली असून त्यामुळे मान्सूनला पुढे सरकण्यासाठी आवश्यक वातावरण तयार झाले. अरबी समुद्रातही आर्द्रता वाढली असून, मोसमी वारे सक्रिय झाले आहे.

मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सूनपूर्व सरी बरसल्या. विशेषत: सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. हा पाऊस मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व स्वरूपाचा होता. वातावरणातील वाढलेली आर्द्रता आणि सक्रिय मोसमी वा–यांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १० जूनच्या सुमारास मान्सून महाराष्ट्राच्या दक्षिण भागात तर १५ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रत बरसू शकेल अशी अपेक्षा होती. परंतु यंदा केरळमध्येच मान्सून उशिरा पोहोचल्याने महाराष्ट्रातील आगमनाच्या तारखांमध्ये बदल होणार असे वाटत होते. हवामान विभागाने जारी केलेल्या पर्जन्यमान नकाशामध्ये दक्षिण भारतातील अनेक भागात मुसळधार पावसाची शक्यता दर्शवण्यात आली आहे तर उत्तर भारतातील मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागात तुलनेने कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने काही राज्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत. हवामानातील बदलांसाठी सतर्क राहण्याचा इशारा म्हणजे यलो अलर्ट. ऑरेंज अलर्ट म्हणजे अधिक गंभीर परिस्थितीची शक्यता.

यामध्ये जोरदार पाऊस, वादळी वारे, मेघगर्जना किंवा विजांचा कडकडाट होऊ शकतो. हवामान विभागाच्या अंदाजानुसार ४ जून रोजी दिलेल्या माहितीनुसार केरळ, कर्नाटक, गोवा किनारपट्टी आणि दक्षिण कोकण भागात मान्सूनचे आगमन झाले आणि आता पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडू शकतो. अखेर केरळमध्ये व महाराष्ट्रतही मान्सूनचे आगमन झाले. एक–दोन दिवसांत राज्यातील अनेक भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अगोदरच मान्सूनपूर्व कोकण आणि विदर्भातील विविध जिल्ह्यांत वादळी वारा आणि विजांसह पाऊस होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील दोन–तीन दिवस पावसाचा जोर कायम राहील. २४ जिल्ह्यांना यलो तर ३ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. कोकण विभागात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून पावसाचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. मराठवाड्यातील हवामानात मोठे बदल जाणवत असून तापमानात एक ते दोन अंशाची घट झाली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात तुरळक ते हलक्या स्वरूपाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. लातूर, धाराशिव परिसरात ताशी ५० किमी वेगाने वारे वाहून विजांसह पावसाचा अलर्ट आहे. शेतक–यांना शेतीची प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतक–यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतक–यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये.

सध्या पडणारा पाऊस नियमित मान्सूनचा समजून शेतक–यांनी शेतीकामांना सुरुवात करू नये. जर शेतक–यांनी अपु–या ओलाव्यावर पेरणी केली तर बियाणे वाया जाण्याची आणि पर्यायाने दुबार पेरणीचे मोठे आर्थिक संकट ओढवण्याची दाट शक्यता आहे. सरासरीपेक्षा कमी पावसाच्या अंदाजामागील एक प्रमुख कारण म्हणजे जुलै महिन्यानंतर एल निनोची परिस्थिती सक्रिय होणे हे आहे. याचा परिणाम ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील पावसावर होऊ शकतो. रोहिणी नक्षत्रात पाऊस पडला तर खरीप हंगाम चांगला जातो अशी शेतक–यांची श्रद्धा असते. बहुतेक शेतक–यांची नांगरणी झाली आहे, शेणखत टाकून झाले आहे. पाऊस वेळेवर झाला तर कापूस, सोयाबीनची पेरणी करण्यास ते तयार आहेत. सध्या सोयाबीन, कापूस, तूर पिकांच्या बियाणांना मागणी आहे. ब–याच ठिकाणी पाणीसाठ्याची स्थिती मात्र चिंताजनक आहे. अनेक लहान–मोठ्या प्रकल्पांतील पाणी पातळी खालावली आहे. त्यामुळे वेळे–वर चांगला पाऊस होणे गरजेचे आहे. अर्थात उद्यापासून (८ जून) मृग नक्षत्र सुरू होणार असून त्याचे वाहन ‘बेडूक’ असल्याने चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## अंतरंग



### सरकारने वस्तू सेवा करात काटकसर करावी

एप्रिलपासून सुरू झालेले आर्थिक वर्ष बरेच अनर्थकारी ठरण्याची लक्षणे दिसत आहेत. अमेरिका, इराण युद्धानतर जागतिक स्तरावर बदललेल्या परिस्थितीचे काही महत्त्वपूर्ण परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहेत. प्रामुख्याने इंधन टंचाई आणि त्यातून अनिवार्यपणे उद्भवलेली इंधनाची दरवाढ हे भारताच्या ग्रोथ इंजिनचा वेग मंदावेल की काय अशी परिस्थिती दिसते आहे. देशाच्या पंतप्रधानांनीच येणाऱ्या काळातल्या काही समस्यांची जाणीव करून दिलेली आहे. सरकार करीत असलेले प्रयत्न कदाचित पुरेसे ठरणार नाहीत किंवा सरकारच्या एकट्याच्या प्रयत्नावर परिस्थिती नियंत्रणात राहू शकणार नाही, याकरीता देशातील प्रत्येक नागरिकाचे सहकार्य पंतप्रधानांना गरजेचे वाटलेले दिसते. साधारणपणे गेल्या महिनाभरात अनेक वस्तूंची टंचाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतली दरवाढ आपले रंग दाखवू लागलेली आहे.

इंधन दरवाढीचे परिणाम केवळ जीवनावश्यक वस्तुपुरतेच मर्यादित राहात नाही तर त्याचा सर्वच क्षेत्रांवर हळुहळू परिणाम दिसू लागला आहे. येणारा पावसाळा त्यातला खरिपाचा हंगाम, जून पासून सुरू होणारे शैक्षणिक वर्ष या प्रमुख क्षेत्रांवर इंधन दरवाढीचे सावट घोंघावू लागलेले आहे. सरकार सर्वतो प्रयत्न करून खते, बी–बियाणे यांच्या किमती वाढणार नाहीत यासाठी प्रयत्न करीत आहेत. तरीदेखील काही ना काही प्रमाणात दरवाढ अटळ ठरते आहे. तर दुसरीकडे या शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तकांपासून ते अनेक प्रकारच्या शैक्षणिक साहित्यातसुद्धा पाच दहा टक्क्यांची वाढ होऊ शकते, स्कूल बसेस संघटनांनी आताच पंधरा टक्के दरवाढ करण्याचे जाहीर केले. म्हणजेच वाढते शैक्षणिक शुल्क आणि शिवाय शैक्षणिक साहित्यातली दरवाढ असा दुहेरी भडीमार पालकांवर होऊ घातला आहे. या परिस्थितीचे कारण पुढे करून खासगी शैक्षणिक संस्थासुद्धा आपला स्वार्थ साधून घेण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. कारण आज महाराष्ट्रातसुद्धा जवळपास साठ टक्के खासगी शैक्षणिक संस्थांकडून शैक्षणिक साहित्य आणि त्यांच्याच स्कूल बसेसचा वापर करण्याची सक्ती केली जाते. संपूर्ण वर्षाचे लाख दीड लाख रुपये शुल्क घेतले जाते या शुल्कातील वाढीचेही संकेत मिळू लागले आहेत.

येत्या वर्षभरामध्ये या सगळ्याच समस्यांची तीव्रता वाढतच जाईल. अशा परिस्थितीत सरकारने सुचवलेल्या काटकसरीच्या उपाययोजना आणि वाढती महागाई हा परस्पर विरोध अधिकच चिंता निर्माण करणारा ठरू शकतो. महागाई झाली की, आपोआपच काही वस्तूंच्या वापरावर मर्यादा येतात. परंतु ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत. ज्या वस्तूंना कोणतेही पर्याय नाहीत. त्याच्यामध्ये काटकसर करता येणेदेखील शक्य होत नाही. म्हणजेच अशा काही वस्तूंच्या संदर्भात सरकारने काही वेगळे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सामान्य जनतेच्या महिन्याच्या खर्चावर या इंधन दरवाढीने नियंत्रण आणायला सुरुवात केलेली आहे. परंतु त्यातून होत जाणारी महागाई ही सामान्यांचा खिसा रिकामा करणारी ठरते. महागाईही सहन करा आणि काटकसरही करा, अशा पद्धतीने सामान्यांना कात्रीत पकडण्याचा प्रयत्न होतो आहे. जर देशातील सामान्य माणसांच्या जनजीवनावर या गोष्टींचा फार परिणाम होऊ द्यायचा नसेल तर सरकारला स्वतः काटकसर करावी लागेल. ती काटकसर सरकारच्या उत्पन्नामध्ये किंवा महसुलामध्ये करता येऊ शकते. गेल्या तीन चार वर्षांपासून सगळ्याच वस्तूंवरच्या वस्तू सेवाकरामध्ये वाढ होत गेली आणि दरवर्षी वस्तू सेवाकराचे उत्पन्न सतत काही हजार कोटींनी वाढत गेलेले आहे. सरकारने अगदी काटेकोरपणे जास्तीत जास्त वस्तू सेवाकराच्या अंतर्गत कशा येतील याचे नियोजन केले त्यात जीवनावश्यक अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. आता अशी वेळ आलेली आहे की, महागाई नियंत्रणात आणण्याबरोबरच केंद्र सरकारने लावलेल्या करामध्ये कपात करण्याची आवश्यकता आहे. तीन आठवड्यांपूर्वी इंधनावरच्या शुल्कात सरकारने कपात केली होती. तरीदेखील इंधनाचे दर विशेषतः पेट्रोल–डिझेलचे दर वाढतच असल्याने ते रोखून धरणे केंद्र सरकारलाही शक्य होण्यासारखे दिसत नाही. अशा परिस्थितींत किमान महागाई नियंत्रणात आणण्याकरीता जर वस्तू सेवाकरामध्ये कपात केली तर किमती नियंत्रणात राहू शकतील. वस्तू सेवा करातून केंद्राला आतापर्यंत विक्रमी महसूल मिळालेला आहे. त्यातला काही वाटा हा राज्य सरकारांना दिला जातो. थोडक्यात केंद्र आणि राज्य सरकारांना मिळणाऱ्या महसुलात कपात होईल. ही कपात झाल्यावर अनाठायी होणारे सरकारी खर्चदेखील नियंत्रणात राहातील म्हणजे तिथे आपोआपच काटकसर होऊ शकेल, संभाव्य परिस्थितीचा विचार केला तर टंचाई आणि महागाई या कचाट्यातून दिलासा मिळण्याकरीता हा एक पर्याय ठरू शकतो. वस्तू सेवा कराचे ओझे कमी झाले. तर वस्तूंच्या किमती आपोआप खाली येऊ शकतील. परंतु सरकार लोकांना काटकसर करायला सांगते आहे. मुळातच मर्यादित उत्पन्न असलेला सामान्य माणूस काटकसर करूनच जीवन जगत असतो. आता खरी काटकसर करण्याची कसोटीची वेळ केंद्र आणि राज्य सरकारवर आलेली आहे. सरकारने देशभरातल्या साठ ते सत्तर टक्के सामान्य मध्यमवर्गीय माणसाचा विचार करायला हवा. कारण या इंधन दरवाढीच्या परिणामांची झळ याच वर्गाला बसते. जसे शैक्षणिक साहित्यातल्या किंमतवाढीपासून ते रिक्षा–बसच्या भाडेवाढीपर्यंतचे चटके सहन करावे लागतात.

– अस्मिता देसाई

# टप्प्याटप्प्याने बसणार धक्का : शरद पवार

## राजकारण





केंद्र सरकारने रविवारी सर्वसामान्य जनतेला महागाईचा आणखी एक मोठा झटका दिला. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात थेट २९ रुपयांची वाढ केली आहे. या दरवाढीवर भाष्य करताना शरद पवार यांनी केंद्र सरकारचा समाचार घेताना प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित ठेवतोय, असं सांगितलं. पण, नियंत्रित याचा अर्थ टप्प्या टप्प्यानं हा धक्का द्यायचा हे त्यांचं सूत्र असल्याचे म्हंटले आहे. त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी कळेल, अशा शब्दांत पवारांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.

देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर आधीच गगनाला भिडलेले असताना, केंद्र सरकारने रविवारी सर्वसामान्य जनतेला महागाईचा आणखी एक मोठा झटका दिला आहे. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात थेट २९ रुपयांची वाढ केली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांच्या घरातील किचनचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे. ही दरवाढ १४.२ किलोच्या सिलिंडरवर केली असून, गेल्या तीन महिन्यांत घरगुती गॅसच्या किमतीत झालेली ही दुसरी मोठी वाढ आहे. केंद्राच्या या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांवर कडाडून टीका केली आहे.

या दरवाढीवर भाष्य करताना शरद पवार म्हणाले की, सातत्यानं हे दर वाढवतायेत, या सगळ्या गोष्टीचा परिणाम आज सामान्य माणसाच्या प्रपंचावर होतोय. त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी कळेल, असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधलाय.

दरम्यान, या नव्या दरवाढीनंतर आता राजधानी दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९१३ रुपयांवरून थेट ९४२ रुपयांवर पोहोचली आहे. तर देशातील इतर भागांप्रमाणेच मुंबईतही २९ रुपयांचीच वाढ झाली असून, मुंबईतील दर ९१२.५० रुपयांवरून ९४१.५० रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. यापूर्वी ७ मार्च रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. पेट्रोल–डिझेल व दैनंदिन वापरातील अन्य वस्तूंच्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक अगोदरच मेटाकुटीला आला असताना, आता गॅस सिलिंडरच्या दरांनी गरिबांचे कंबरडे मोडले आहे.

एलपीजी गॅसचे उत्पादन करणाऱ्या सरकारी तेल कंपन्या अजूनही प्रत्येक घरगुती सिलिंडरमागे ७०३ रुपयांचा तोटा सहन करत आहेत. त्यामुळे आगामी काळात घरगुती गॅस सिलिंडरचे भाव आणखी वाढण्याची भीती बाजार तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे. काही दिवसांपूर्वीच १ जून रोजी पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या दरात ४२ रुपयांची वाढ केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या पाच महिन्यांत १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरचे दर तब्बल दुप्पट झाले आहेत. १ जानेवारीपूर्वी १९ किलोच्या सिलिंडरचा दर १५८० रुपये होता, तो १ जून रोजी थेट ३११३.५० रुपयांवर पोहोचला आहे. पेट्रोल–डिझेल, गॅस आणि अन्नधान्याचे दर सातत्याने वाढत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या चिंता वाढल्या आहेत. त्यातच आगामी काळात पावसाने ओढ दिल्यास महागाईचा हा भडका आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### घरगुती गॅसचे दर आणखी वाढणार...

एलपीजी गॅसचे उत्पादन करणाऱ्या सरकारी तेल कंपन्या अजूनही प्रत्येक घरगुती सिलिंडरमागे ७०३ रुपयांचा तोटा सहन करत आहेत. त्यामुळे आगामी काळात घरगुती गॅस सिलिंडरचे भाव आणखी वाढण्याची भीती बाजार तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे. काही दिवसांपूर्वीच १ जून रोजी पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या दरात ४२ रुपयांची वाढ केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या पाच महिन्यांत १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरचे दर तब्बल दुप्पट झाले आहेत.आता राजधानी दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९१३ रुपयांवरून थेट ९४२ रुपयांवर मुंबईतील दर ९१२.५० रुपयांवरून ९४१.५० रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. या दरवाढीमुळे शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांना अप्रत्यक्ष टोला लगावताना टप्प्याटप्प्याने धक्का बसणार असे म्हंटले आहे.

## पंचांग

विक्रम संवत्– २०८२ अधिक ज्येष्ठशके संवत्–१९४८ संवत्सर –पराभवनाम अयन– उत्तरायणारंभ मास–अधिक ज्येष्ठ ऋतु– सौर ग्रीष्म कृष्ण पक्षतिथि : अष्टमी २७ : २३ : ५८+ नक्षत्र : शतभिषा ०९ : ०९ : ३६ योग : विष्कुम्भ ०९ : २७ : ३७ करण : बालव १५ : ३० : १६ करण : कौलव २७ : २३ : ५८+ सूर्य : वृषभ चन्द्र : कुम्भ हिजरी सन् – १४४७ मुस्लिम मास – जिल्हेज तारीख – २२ विशेष कालाष्टमी सूर्या मृगशीर्ष नक्षत्रप्रवेश वाहन : बेडूक.

## राशी भविष्य...

| | |
|---|---|
| मेष | आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. |
| वृषभ | आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल. कोणाचाही राग करू नका. |
| मिथून | कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल. नातेवाईकांशी मर्यादित संबंध ठेवा. |
| कर्क | प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. |
| सिंह | आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचारपूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल. वाईट सवयीपासून दूर रहा. व्यापारात नवीन संबंध जुळतील. |
| कन्या | उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील. प्रतिस्पर्ध्यांमुळे उत्साहात वाढ होईल. |
| तूळ | प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. |
| वृश्चिक | आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील. |
| धनू | मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नोकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील. |
| मकर | आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका. व्यापार व्यवसाय चांगला राहील. |
| कुंभ | न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल. |
| मीन | अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल. |

## पारावरचा फड



विधान परिषद निवडणुकीत १७ जागांपैकी बलवान महायुतीसमोर महाविकास आघाडीच्या निम्म्याहून अधिक जागांवर उमेदवारांनी पळ काढल्याचे दिसून आले. वास्तविक संख्याबळाची ताकद ना लढणाऱ्या पक्षांकडे होती, ना त्या पक्षांच्या नेत्यांनी ताकद लावून लढण्याची तयारी केली. उलट दुय्यम दर्जाच्या कार्यकर्त्यांना उमेदवारी गळ्यात घातल्याने अनेकांनी नेत्यांनाही न विचारता परस्पर अर्ज काढून घेतल्याने आता नेतेही वैतागले आहेत. त्यातून घोडेबाजार झाल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी संसदेत याबाबत बिल आणून मंजुरीचा इशाराही त्यांनी दिला आहे. दुसरीकडे महायुतीकडून उमेदवारीचा वशिलेबाजीतून बाजार झाल्याचाही छुपा सूर आहे. यामध्ये निष्ठावानांपेक्षा आयाराम दिग्गजांना उमेदवारीची खिरापती दिली गेली. या सर्व गदारोळात ‘स्थानिक’मधून निवडून आलेले मतदार हाती काही लागले नसल्याने नाराज आहेत. याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** आरं त्या इधान परिषदेच्या इलेक्शानचा लडतीआगुदरच घोडेबाजार झाल्याचा आरोप सुपरियाताई कराय लागल्याती.

**बाबूराव :** व्हय, जनू त्येंचा पक्ष आन् म्हाईकास आगाडीवालं धुतल्या तांदळासारकंच. आरं जिसकी लाटी उसकी भैस हे राजकारनात काय नवं हाय व्हय.

**पांडूनाना :** तसं आसंल तर पुन्यात त्येंच्या उमेदवाराला थोरल्या पवारसायबानी मागं कुनापाई घ्याय लावलं?

**बाबूराव :** खराय बग. समद्याचा आपापल्या मनाचा कारबार, पै–पावनं, पैकंवाल्यास्नी तिकिटं ह्यो आता समदीकडं निकष झालाया. त्यात सत्ता तिकडं चांगबलं?

**पांडूनाना :** व्हय, आन् आता कांगरेस, उबाटा आन् पवार सायबाची राष्टरवादीत आता दिग्गज कुनी उरलंच न्हाय. मग काय पडायसाटी दुसऱ्या फळीच्या कार्यकरत्यास्नी वडून उबं करत्यात. बळ देनार कोन?

**बाबूराव :** म्हनून तर ह्येंचा नाद सोडून आनेकांनी पळ काडला. आता त्येंचं हात वल्लं झालं आसत्याल तर काय बिगडलं? उरलं सुरलंच हाय त्ये.

**पांडूनाना :** नेत्यास्नी न इचारता मागं घेटलं; वाईट वाटतंया.

**बाबूराव :** आन् तिकडं म्हायुतीवालं तर कुटं कार्यकर्त्यास्नी न्याय देत्याती. समदा बाजारच की.

**पांडूनाना :** आता राज्यसबेच्या एका जागेवरनं बी घमासान सुरु हाय. हिकडं भुजबळ मंतरी आसून लडतो राज्यसबेवं जातो म्हंत्यात. तिकडं नवनीत रानाबाई भाजपमदी आसून सुनेतराताईकडं तिकिट मागत्यात.

**बाबूराव :** समदा खेळखंडोबाच हाय.

**पांडूनाना :** सत्ताधारी, इरोदकांचं समदं सोयीचं...ह्येलाच म्हंत्यात राजकारन!

– अमृत चौगुले


## उपदेश कथा



### रामकृष्णांची परीक्षा

रामकृष्ण परमहंस हे अगदी शुद्ध मनाचे सत्पुरुष होते. त्यांना कशाचाही मोह नव्हता की आसक्ती नव्हती. पैशाला तर ते स्पर्शही करीत नसत त्यामुळे शिष्यांच्या मनात त्यांच्याविषयी आदर होता पण तरीही ते सांगत, ‘गुरुविषयी आंधळी श्रद्धा मनात ठेवू नये. सावकार प्रत्येक नाणं खणखण वाजवून खरं आहे की नाही हे तपासून घेतो. तसंच आपण गुरू खरा आहे की खोटा हे तपासून घ्यावं.’ एकदा नरेंद्राने त्यांची अशी परीक्षा घ्यायचे ठरवले. ते स्नानाला गेलेले असताना त्याने त्यांच्या बैठकीखाली रुपयाचे एक नाणे ठेवून दिले. थोड्या वेळाने रामकृष्ण परत आले आणि बैठकीवर बसले पण बसता क्षणी जणू एखादा विंचू चावावा तसे ताडकन् उठले. बैठकीची चादर बाजूला करून त्यांनी पाहिले तो तेथे रुपया ठेवलेला. त्यांना फार धक्का बसला आणि ते अस्वस्थ झाले. ‘कुणी ठेवला हा रुपया येथे?’ त्यांनी विचारले. नरेंद्र जवळच उभा होता. त्याने रामकृष्णांची क्षमा मागितली आणि म्हणाला, ‘आपल्या मनात पैशाविषयीची आसक्ती अजिबात नाही, असं आपण नेहमी म्हणता. आपली तशी परीक्षा घ्यावी म्हणून मीच हा रुपया ठेवला होता. क्षमा करा मला !’ रामकृष्ण म्हणाले, ’क्षमा कशाला मागतोस? तू काहीही चूक केली नाहीस. गुरुला गुरू म्हणून स्वीकारण्यापूर्वी त्याची अशी परीक्षा अवश्य घेतली पाहिजे. आपली निष्ठा अशीच सत्यावर असली पाहिजे. गुरुच्या शब्दांवर नाही! या घटनेमुळे रामकृष्णांचे नरेंद्रावरचे प्रेम वाढीला लागले आणि नरेंद्राची गुरुनिष्ठाही !

## दिनविशेष...



**अंतरराष्ट्रीय**

६८ – रोमन सेनेटने गॅल्बाची रोमन सम्राटपदी निवड केली.

५३६ – संत सिल्व्हेरियस पोपपदी.

७९३ – इंग्लंडवरील व्हाइकिंग टोळ्यांच्या हल्ल्यांची पहिली नोंद.

१७८३ – आइसलंडमधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक. ९,००० ठार, पुढील ७ वर्षे दुष्काळ.

१७८९ – अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष जेम्स मॅडिसनने नागरिकांच्या हक्कनाम्याचा मसुदा अमेरिकन संसदेत माडला.

१८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – टेनेसी अमेरिकेपासून विभक्त झाले.

१८६६ – कॅनडाच्या संसदेची ओटावामध्ये पहिली बैठक.

१८८७ – हर्मन हॉलेरिथला पंच कार्ड कॅल्क्युलेटर साठी पेटंट प्रदान.

१९४१ – दुसरे महायुद्ध – दोस्त राष्ट्रांनी सिरीया व लॅबेनॉन वर आक्रमण केले.

१९४२ – दुसरे महायुद्ध – जपानच्या पाणबुड्यांनी ऑस्ट्रेलियातील सिडनी व न्यूकॅसल शहरांवर बॉम्बफेक केली.

१९४८ – जॉर्ज ओरवेलची नाइन्टीन एटी फोर(१९८४) ही कादंबरी प्रसिद्ध झाली.

## समाजाची मानसिकता कधी बदलणार?

बेकायदेशीर गर्भलिंग निदान करून स्त्री भ्रूण हत्या करणे कायद्याने गुन्हा असतानाही असे प्रकार सातत्याने घडताना दिसतात. अर्थात याला समाजाची मानसिकता कारणीभूत आहे आज २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातील आहे हेच यावरून सिद्ध झाले आहे. स्त्री भ्रूण हत्येच्या घटनांवरून सिद्ध होते की आजही आपण मुलींकडे सकारात्मक दृष्टीने पाहत नाही. केवळ ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही मुलींकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. आजही समाजातील काही लोकांत आहे जरी मुलगी जन्माला आली तरी तिला प्रत्येक पातळीवर मानहानी स्वीकारावी लागते. मुलींबद्दल आपल्या समाजात कमालीची असहिष्णुता दिसते. कधी मुलींना गर्भातच मारून टाकले जाते तर कधी जन्मल्यानंतर कचऱ्याच्या कुंडीत फेकून दिले जाते. केवळ बेटी बचाओ, बेटी पढाओ अशी नारेबाजी करून मुली वाचणार नाहीत तर त्यासाठी सरकारने ठोस धोरण आखायला हवे. लिंग परीक्षण, स्त्री भ्रूण हत्ये विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करायला हवी. दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलायला हवी त्यासाठी समाजाचे सातत्याने प्रबोधन व समुपदेशन करायला हवे.

## जन की बात...



### ‘लाडकी बहीण’मधील घोटाळा धसास लावा




लाडकी बहीण योजना विधानसभेच्या निवडणुकी अगोदर घोषित झाली. त्यावेळी अनेक महिलांनी अर्ज केले. ज्या अटी सरकारने ठरविल्या होत्या, त्याप्रमाणे ही योजना सुरु झाली. विशेष म्हणजे स्वघोषणापत्राच्या आधारे हे अर्ज स्वीकारले गेले . त्याचा फायदा अनेकांनी घेतला. विशेष म्हणजे ही योजना केवळ लाडक्या बहिणीसाठीच होती. पण त्याचा फायदा तब्बल चौदा हजार पुरुषांनी घेतला अनेक सरकारी नोकरीतील लाभार्थी या योजनेचा फायदा घेऊन गेले. या योजनेसाठी उत्पन्नाची अट अडीच लाख एवढी होती. तथापि या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांनी या योजनेचा फायदा गेले सुमारे २२ महिने घेतला अशांची संख्या दहा लाख एवढी प्रचंड आहे एका बातमीनुसार ५ लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे गेल्या बावीस महिन्यात राज्य सरकारचे तब्बल २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत. अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे हे सारे पैसे सरकारचे म्हणजे जनतेचे आहेत जे जनतेकडून वसूल करण्यात आले आहेत. केवळ मते जातील या भावनेतून परत वसूल न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे तो कितपत योग्य आहे ? वास्तविक पाहता ज्या वेळी योजना सुरू झाली त्यावेळी त्याचे चेकिंग न करताच ती कार्यवाहीत करण्यात आली होती काय ?. आज लाखो अपात्री सापडत आहेत. अनेक पुरुषांनी याचा लाभ कसा घेतला ? हे सारे प्रश्न सामान्य जनतेला पडले आहेत. कारण सरकारला लोकांकडून कराद्वारे पैसा जमा होतो एखाद्या योजनेची सरकारी पातळीवर कशी वाटचाल होते हे लाडकी बहीण या योजनेद्वारे दिसून आले आहे आता विरोधी पक्षांनी हा प्रश्न उचलून धरला आहे. या २६ हजार कोटी रुपयातून अनेक कल्याणकारी योजना राबविता आल्या असत्या येणाऱ्या अधिवेशनात विरोधी आघाडीने हा प्रश्न धसास लावला पाहिजे.

## दख्खनची राणी शंभरीकडे




पुणे–मुंबई दरम्यान प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांशी कौटुंबिक नाळ जोडली असलेल्या दख्खनची राणी अर्थात डेक्कन क्वीनने ९६ वर्ष पूर्ण करून ९७ वर्षात पदार्पण केले आहे. या रेल्वेने प्रवास करणाऱ्यांना रेल्वे प्रवाशांनी १ जूनला ९६ वा वाढदिवस जोरात साजरा केला. डेक्कन क्वीनचे वैशिष्ट्य म्हणजे डायनिंग अर्थात जेवणाचा डबा असलेली भारतातील ही पहिली रेल्वे आहे. मायक्रोवेव्ह ओव्हन,डीप फ्रिजर,टोस्टर अशा आधुनिक पँटी सुविधा आणि कुशनच्या खुर्च्या व कार्पेटसह ३२ प्रवाशांसाठी टेबल सेवा उपलब्ध करून दिली आहे. या रेल्वेने प्रवास करताना प्रवाशांना अनोखा अनुभव घेता येतो. डेक्कन क्वीनला तीन वर्षांपूर्वी विस्तारित कोचही जोडल्याने निसर्गरम्य घाटातून प्रवास करताना सह्याद्रीच्या मनमोहक दृश्याचा आनंद प्रवाशांना घेता येतो. अशी दख्खनची राणी अर्थात डेक्कन क्वीन तीन वर्षातच शंभरीकडे वाटचाल करणार आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराचे प्रतिनिधित्व करणारी ही गाडी अल्पावधीतच दख्खनची राणी म्हणून ओळखली जावू लागली. दख्खनची राणीला खूप शुभेच्छा!

# केडगावमध्ये अवैध गर्भपाताचा मोठा पर्दाफाश लवंगारे हॉस्पिटलच्या दोन डॉक्टरांवर गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील केडगाव येथे अवैधपणे गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. याप्रकरणी यवत पोलीस स्टेशनमध्ये दोन डॉक्टरांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, ६ जून २०२६ रोजी दुपारी १.४५ च्या सुमारास केडगाव येथील 'लवंगारे मॅटर्निटी ॲण्ड इन्फर्टिलिटी हॉस्पिटल'मध्ये हा प्रकार घडल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी उपजिल्हा रुग्णालय, दौंड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन विठ्ठल गुजर यांनी फिर्याद दिली आहे. डॉ. स्वाती लवंगारे (रा. केडगाव, ता. दौंड, जि. पुणे) आणि डॉ. तुकाराम यशवंत मोटे (रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलीस तपासात असे समोर आले आहे की, डॉ. स्वाती लवंगारे या स्त्रीरोगतज्ज्ञ नसतानाही व त्यांना अधिकृत परवानगी नसताना गर्भपाताच्या गोळ्यांचा साठा करून अवैधपणे गर्भपात केला. तसेच, डॉ. तुकाराम मोटे यांनी गर्भपाताच्या गोळ्या रुग्णांना दिल्या असून, त्यांच्या नावाच्या आणि सहीच्या नोंदी आढळून आल्या आहेत. यावरून हा गैरप्रकार उघडकीस आला.

यवत पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आणि 'वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१' च्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर वागज करत आहेत.

या घटनेचा अधिक तपास सुरू असून, या अवैध रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत.

> डॉ. स्वाती लवंगारे हिने यापूर्वीही 'मुलगाच होईल' असे खोटे आश्वासन देऊन एका महिलेवर चुकीचे उपचार करून तिची ३. ५० लाखाला फसवणूक केली आहे. यासंदर्भात देखील डॉ. लवंगारे हिची व तिला पाठीशी घालणाऱ्यांची चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

## खामगाव येथे हुमणी अळी नियंत्रणासाठी कृषी विभागाकडून प्रकाश सापळ्याचे प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांना मिळाले प्रभावी तंत्र



■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत :** महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी विविध जनजागृती मोहिमा राबविण्यात येत आहेत. दौंडचे तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाणे, मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप आणि उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीविषयक विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून दौंड तालुक्यातील खामगाव येथे प्रगतशील शेतकरी दत्तात्रय सोपान नागवडे यांच्या शेतावर 'हुमणी अळी नियंत्रण' या विषयावर विशेष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते.

यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राची शास्त्रीय माहिती देत, ती पिकांसाठी कशी घातक ठरते, याचे गांभीर्य पटवून दिले. हुमणीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर हा अत्यंत स्वस्त आणि प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकाश सापळ्यांकडे आकर्षित होणाऱ्या भुंग्यांचा नायनाट केल्यास पुढील हंगामातील पिकांचे मोठे नुकसान टाळता येते, असे त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

यावेळी पंढरीनाथ कुतवळ यांनी प्रकाश सापळ्यांची कार्यपद्धती आणि ते लावण्याच्या योग्य वेळेबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. निसर्गातील कीटक नियंत्रणासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये हुमणी नियंत्रणाबाबत मोठी जागृती झाली असून, यावेळी दत्तात्रय नागवडे, मनीषा नागवडे, अविनाश नागवडे किरण नागवडे, आदित्य नागवडे, ज्ञानदा नागवडे, वेदश्री नागवडे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाने दिलेल्या या तांत्रिक माहितीमुळे आगामी खरीप हंगामात हुमणीवर नियंत्रण मिळवण्यास शेतकऱ्यांना निश्चितच मोठी मदत होणार आहे. अशी भावना अविनाश नागवडे यांनी बोलून दाखविली.

# पाच कंदील चौकाला बाळासाहेब ठाकरेंचे नाव द्यावे

## महाराष्ट्र केसरी रघुनाथ पवार यांचा सत्कार करावा मातोश्री प्रतिष्ठानची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** शिरूर शहरातील ऐतिहासिक पाच कंदील चौकाचे सध्या नूतनीकरणाचे काम चालू असून या पाच कंदील चौकस स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्यावे अशी मागणी तसेच महाराष्ट्र केसरी रघुनाथ (दादा) पवार यांचा यथोचीत सन्मान शिरूर नगर परिषदेने करावा अशी मागणी मातोश्री प्रतिष्ठानच्यावतीने नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना निवेदन देऊन करण्यात आली.

यावेळी मातोश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी सांगितले की १९८६ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची सभा शिरूर शहरातील चौकात झाली होती व या पाच कंदील चौकात अनेक नेत्यांच्या सभा झाल्या असल्या तरी या चौकाला बाळासाहेब ठाकरे यांच्या सभेने एक वेगळी ओळख मिळाली.त्यामुळे या चौकाला त्यांचे नाव द्यावे ही मागणी मातोश्री प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे.तसेच



शिरूर शहरातील नामवंत मल्ल महाराष्ट्र केसरी रघुनाथदादा पवार यांनी भारतासाठी सुवर्णपदक मिळवून दिले तसेच अनेक कुस्ती क्षेत्रात अनेक मल्ल घडवले आणि महाराष्ट्र केसरीचा पुणे जिल्ह्यातील पहिला मान रघुनाथ पवार यांना मिळाला असून हे शिरूर शहरासाठी कौतुकास्पद असून त्यामुळे शिरूर शहराच्यावतीने शिरूर नगर परिषदेने त्यांचा यथोचीत सत्कार करावा अशी मागणी या वेळी करण्यात आली.

## खेड तालुक्यात मोफत धान्य योजनेचा लाभ घेणारे उच्च उत्पन्न गटातील १० हजार पेक्षा अधिक लाभार्थी

■ जनप्रवास वार्ताहार

**राजगुरुनगर :** शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानांमार्फत मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांवर प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. खेड तालुक्यातील १९४ स्वस्त धान्य दुकानांमधून लाभ घेणाऱ्या सुमारे १० हजार ८४७ लाभार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

या लाभार्थ्यांना ७ मेपासून धान्य वितरण बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली असून, त्यांनी आपला खुलासा सादर करावा, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी दिली आहे. शासनाची मोफत धान्य वितरण व्यवस्था हि गोर गरीब ,गरजू कुटुंबासाठी आधार देणारी ठरली असली तरी आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेले नागरिक मोफत धान्याचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.शासनाने मिशन सुधार कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या पडताळणीत आयकर विवरणपत्र (खळठ) भरणारे, स्वत:च्या नावावर व्यावसायिक फर्म असलेले तसेच करदाते असलेल्या १० हजार ८४७ लाभार्थ्यांची नावे समोर आली. त्यानुसार संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी,२१५ जणांनी खुलासे सादर केले असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक अधिकारी एम. ए.कुंभार यांनी दिली.

खेड तालुक्यात १९४ स्वस्त धान्य दुकानातून ६५हजार पेक्षा अधिक शिधाधारक संख्या असून त्यामध्ये केसरी कार्ड ६०७५१, अंतोदय ३२७१,तर शुभ्र कार्ड धारकांची संख्या १०२५ इतकी असून केसरी कार्ड धारकांना मानसी दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू तर अंतोदय लाभार्थींना २२ किलो गहू,१३ किलो तांदूळ,देण्यात येतो. शासनाच्या निकषांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ केवळ पात्र व गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचावा, यासाठी अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू असून संबंधितांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांचे धान्य वितरण बंद करण्यात येणार आहे.

## राजगुरुनगर येथे प्रतिलिपी अधिकार अधिनियम अंतर्गत खेड पोलिसांची मोठी कारवाई, पाच व्यावसायिकावर गुन्हे दाखल

■ जनप्रवास वार्ताहार

**राजगुरुनगर :** कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन करून बनावट व अनधिकृत वस्तूंची विक्री करणाऱ्यांविरोधात खेड पोलिसांनी राजगुरुनगर शहरात मोठी कारवाई केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच व्यावसायिकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पुमा सी कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी महेंद्र सोहन सिंग देवरा, वय ३६ रा. बिरोलिया, राजस्थान यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील वाडारोड परिसरातील रेडीमेड कपडे ,तसेच चप्पल, बुटाच्या दुकानात प्रसिद्ध कंपन्यांचे ,कॉपीराइट,विना परवाना विक्री होत असल्याची तक्रारीवरून गुरुवार दिनांक ४ रोजी संध्याकाळी वाडा रोड येथील उमेश ट्रेडींग कंपनीचे होलसेल क्लॉथ सेंटर, साई आर्केड येथील पवार फुटवेअर हब, रॉयल होलसेल हब, सेंट्रल मेन्स हब, पहिल्या मजल्यावर असलेले होलसेल हब या व्यावसायिक दुकानावर छापे टाकण्यात आले.या दरम्यान संबंधित दुकानातून पुमा या प्रसिद्ध कंपनीचा विक्री करण्याचा परवाना नसताना हुबेहूब व्यापारचिंह,लोगो,आकार,अक्षर असणारे बनावट टि शर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट, शुज, चप्पल विक्री करीत असल्याचे आढळून आले.याप्रकरणी उमेश संभाजी सातपुते,सुनील रघुनाथ पवार, आजाद रशीद मोमीन,फैजल अब्दुलगफ्फार शेख, युवान आसिफ मोमीन,सर्व राहणार राजगुरुनगर,या व्यावसायिकावर प्रतिलिपी अधिकार अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून,दुकानातील कॉपीराइट केलेला एकूण सात लाख ३८ हजार ८८६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे हि कारवाई खेड पोलिस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक महेश गरड यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार प्रवीण आढारी,महेश गोसावी,सुरज राक्षे,महिला पोलिस मिथिला मोरे यांच्या पथकाने केली. राजगुरुनगर शहरातील अनधिकृत व बनावट वस्तू विक्री प्रकरणी प्रथमच झालेल्या मोठ्या कारवाईमुळे व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.

## फाकटे शाळेचे नवोदय परीक्षेत यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळी हाजी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा –फाकटे,केंद्र –जांबुत,तालुका शिरूर, जिल्हा–पुणे या शाळेतील आयुष सीमा नागेश केदारी या विद्यार्थ्यांची नुकतीच जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये निवड झालेली आहे. फाकटे शाळेतील इयत्ता सहावीचा विद्यार्थी आयुष हा अतिशय हुशार, कष्टाळू, चुनचुनित आणि हजर जबाबी विद्यार्थी असून त्याची नवोदय परीक्षेत निवड झाल्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फाकटे शाळेची मान उंचावली असून



त्याचे संपूर्ण बेट भागातून कौतुक होत आहे. त्याला मार्गदर्शन करणारे शिष्यवृत्ती तज्ञ आदर्श शिक्षक श्री बाबाजी पोपट हिलाळ सर यांनी त्याचे कौतुक केले.तसेच तालुक्याचे मा. आमदार मा. पोपटराव गावडे साहेब,जिल्हा परिषद सदस्य राजू शेठ गावडे,पंचायत समिती सदस्य सुनिता ताई कड तसेच गटशिक्षणाधिकारी–मा. प्रितम कोकणे साहेब,विस्ताराधिकारी मा. श्री बाळकृष्ण कळमकर साहेब, केंद्रप्रमुख मा. श्री गणेश काळे सर मुख्याध्यापक सौ प्रिया काळे मॅडम व सर्व फाकटे ग्रामस्थांकडून त्याचे कौतुक होत आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण शिरूर नगरपरिषदेच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शिरूर नगरपरिषदेच्यावतीने शुक्रवार दि.५ रोजी नमामि चंद्रभागा प्रकल्प, सोनार आळी या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवडीचे महत्त्व आणि नदी स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमात शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे,




मुख्याधिकारी प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष मितेश गादीया, बांधकाम समिती सभापती सुनिल जाधव, स्वच्छता, वैद्यकीय आरोग्य समिती सभापती एजाज बागवान, पाणीपुरवठा समिती सभापती सुनिता पोटे, नियोजन व विकास गृहनिर्माण समिती सभापती स्वाती साठे, महिला व बालकल्याण समिती सभापती आयेशा सय्यद, उपसभापती स्वप्नाली जामदार, नगरसेवक अभिजीत पाचर्णे, निलेश गाडेकर, सागर नरवडे, निलेश पवार अमोल चव्हाण, नगरसेविका संगीता मल्लाव, सुनीता भुजबळ, पुजा पोटावळे यांसह नगरपरिषदेचे रचना सहाय्यक पंकज काकड, नगर अभियंता समाधान मुंगसे, सहाय्यक कर निरीक्षक दीपक कोल्हे, विद्युत अभियंता तेजस शिंदे, संगणक अभियंता रत्नदीप पालके, स्थापत्य अभियंता शामली लाड, सहा.कार्यालयीन अधीक्षक शीतल काळे, लेखापरीक्षक दत्तात्रय टोपे, अग्निशमन अधिकारी सचिन वाळुंज, भांडारपाल भगवान दळवी, भूषण कडेकर, महेश कदम, विकी उमाप, मनोज अहिरे, मयूर जाधव, विजय गायकवाड, मिठ्ठू गावडे आदी उपस्थित होते.

> हरित शिरूर घडविण्यासाठी नागरिकांनी देखील वृक्ष लागवड व संवर्धनात सहभागी व्हावे तसेच शिरूर नगरपरिषदेमार्फत शहरात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून भविष्यातही अशा पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी सांगितले.

# ऐतिहासिक रस्ता, चौक, वास्तुला भुषण देशमुख यांचे नाव द्यावे

## रमेशभाऊ गुगळे यांनी व्यक्त केली अपेक्षा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** जामखेडच्या मातीत जन्मलेले भुषण देशमुख हे असामान्य व्यक्तिमत्त्वाचे धनी होते.आपल्या ज्ञान, अभ्यास, विनम्रता आणि कार्यकर्तृत्वामुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा अभिमान बनले . दि ६ जून रोजी इतिहासाचे अभ्यासक ,पत्रकार लेखक भुषण देशमुख यांचे दूखद निधन झाले .नगरच्या प्रत्येक दगडामागचा इतिहास, प्रत्येक वास्तूमागची कथा आणि प्रत्येक वारशामागचा संदर्भ जणू भूषण यांच्या स्मरणात जिवंत होता. इतिहास त्यांनी फक्त अभ्यासला नाही, तर ते इतिहास जगले आणि हजारो लोकांपर्यंत पोहोचवला.

नगरच्या इतिहासासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या भूषण गोपाळ देशमुख यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात म्हणून अहिल्यानगरमधील एखाद्या ऐतिहासिक रस्त्याला, चौकाला किंवा वारसा मार्गाला त्यांचे नाव देण्यात यावे. इतिहास जपणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाला तीच खरी आणि योग्य आदरांजली ठरेल. असे मत एच यु गुगळे उद्योग समूहाचे रमेशभाऊ गुगळे यांनी व्यक्त केले . नगरच्या इतिहासाचा चालता–बोलता ज्ञानकोश, वारशाचा जागरूक प्रहरी, अभ्यासू पत्रकार, निष्ठावान इतिहास संशोधक आणि असंख्य इतिहासप्रेमींचा मार्गदर्शक



काळाच्या पडद्याआड गेला. अहिल्यानगर जिल्ह्याने इतिहासाच्या एका मार्गदर्शकाला गमावले आहे.

'हेरिटेज वॉक'च्या माध्यमातून त्यांनी अनेक पिढ्यांना आपल्या शहराची ओळख करून दिली. त्याच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळे नगरचा इतिहास केवळ पुस्तकांत राहिला नाही, तर लोकांच्या मनात जिवंत झाला. इतिहास संवर्धनासाठी त्यांनी घेतलेली अथक धडपड, प्रामाणिक संशोधन आणि नि:स्वार्थ योगदान कायम स्मरणात राहील. भुषण देशमुख एक व्यक्ती हरपली नाही, तर इतिहासाचा एक अमूल्य दस्तऐवज, संस्कृतीचा सजग रक्षक आणि वारशाचा खरा उपासक हरपला आहे. नगरच्या इतिहासासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या भूषण गोपाळ देशमुख यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात म्हणून अहिल्यानगरमधील एखाद्या ऐतिहासिक रस्त्याला, चौकाला किंवा वारसा मार्गाला त्यांचे नाव देण्यात यावे. इतिहास जपणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाला तीच खरी आणि योग्य आदरांजली ठरेल.

या बाबीची शासन ,प्रशासन इतिहासप्रेमी यांनी दखल घ्यावी अशी अपेक्षा रमेशभाऊ गुगळे यांनी व्यक्त केली.

## शिक्षक धनंजय ठोके यांना 'नव्वदोत्तरी दलित नाटक व दलित रंगभूमी' या विषयात पीएचडी पदवी प्रदान!

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** जय हिंद ज्युनियर कॉलेजचे शिक्षक प्रा. धनंजय शिवचंद ठोके यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने मराठी विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी 'नव्वदोत्तरी दलित नाटक व दलित रंगभूमी' या अत्यंत अभ्यासपूर्ण विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

प्रा. धनंजय ठोके यांचे उच्च शिक्षण (एम.ए., बी.एड., एम.एड., एम.फिल. आणि नेट) मराठी विषयातून झाले आहे. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातून त्यांनी आपले संशोधन कार्य पूर्ण केले. यासाठी त्यांना डॉ. संभाजी मलघे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी त्यांना तब्बल १० वर्षे लागली. पीएचडी प्रवेशानंतर काही महिन्यांतच संपूर्ण जगावर कोव्हिडचे संकट ओढवले. या अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण काळात संशोधन पुढे सुरू ठेवणे हे मोठे आव्हान होते. मात्र, ग्रंथालयांची मदत, मार्गदर्शकांचे सहकार्य आणि मित्रांची साथ यांच्या बळावर त्यांनी या संकटावर मात करत आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले. प्रा. ठोके यांनी एका बाजूला जय हिंद कॉलेजमध्ये अध्यापनाचे कर्तव्य बजावत असताना, दुसरीकडे संशोधनाचा दर्जा कुठेही कमी होऊ दिला नाही.

## संक्षीप्त वृत्त

### डिलिव्हरी पार्टनर्स साठी इलेक्ट्रिक मोबिलिटीची उपलब्धता वाढवण्याच्या उद्देशाने फ्लिपकार्ट तर्फे ईव्ही असिस्ट ची सुरुवात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** फ्लिपकार्ट या भारतील स्वदेशी अशा ई कॉमर्स मार्केटप्लेस ने नुकतीच ईव्ही असिस्ट ही त्यांचे डिलिव्हरी एक्झिक्युटिव्हज असलेल्या विशमास्टर्स साठी विशेष रुपाने त्यांची इलेक्ट्रिक वाहने (इव्हीज) ची उपलब्धता वाढवणारी सुविधा सुरु केली आहे. सध्या ही सुविधा २० हून अधिक शहरांतील फ्लिपकार्ट मिनिट्स च्या रायडर्स साठी उपलब्ध असून ही सुरुवात म्हणजे फ्लिपकार्टच्या ईव्ही १०० या लास्ट माईल डिलिव्हरी वाहनांना इलेक्ट्रिक वाहनांमध्ये परावर्तित करण्याच्या योजनेचा एक भाग आहे. फ्लिपकार्टच्या ईव्ही वाहनांमध्ये गेल्या वर्षभरात दुप्पट वाढ होऊन २०२५ च्या सणासूदीच्या दिवसात त्यांनी २० हजार वाहनांचा टप्पा पार केला आहे. भारत जसजसा वेगाने इलेक्ट्रिक वाहनांचा प्रचार करत असतांना इव्ही असिस्ट मुळे हा बदल अधिक सकारात्मक आणि डिलिव्हरी पार्टनर्स साठी अधिक चांगला होणार आहे. आपल्या तंत्रज्ञानातील क्षमतांचा वापर करुन फ्लिपकार्ट विश्वसनीय अशा इव्ही वाहनांसह भाडे सेवा प्रदात्यांना एकाच मंचावर ईव्ही असिस्टच्या माध्यमातून आणत आहे. या उपक्रमामुळे डिलिव्हरी पार्टनर्स ना सर्वसाधारणपणे ईव्हीची निवड करण्यासाठी येणार्या समस्या जसे परवडणारे दर, वाहनाची मालकी आणि भाडेतत्वावर वाहने घेण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

### माईंच्या लेकी-जावयांचा सन्मान' सोहळ्यात उसळला भावनांचा महापूर



■ जनप्रवास प्रतिनिधी

**सासवड :** पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी उभारलेल्या विशाल कुटुंबातील मायेचा, संस्कारांचा आणि नात्यांच्या जिव्हाळ्याचा प्रत्यय आज पुन्हा एकदा आला. ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अधिक मासाचे वाण – माईंच्या लेकजावयांचा सन्मान या आगळ्यावेगळ्या सोहळ्यात भावनांचा अक्षरशः महापूर उसळला.

यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममता सिंधुताई सपकाळ, कीर्ती, ज्योती, मंजुषा आणि गौरी यांनी अतिशय भावनाविवश होत आपल्या भावना व्यक्त केल्या. माईंचे पहिले मानसपुत्र दीपकदादा गायकवाड हेच आमच्या सर्व लेकींसाठी खरे माहेर आहेत. दादा आजही कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारीने भूमिका पार पाडत आहेत. ते आम्हाला कधीच विसरत नाहीत, याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्या लेकरांना त्यांच्या रूपाने प्रेमळ, कर्तृत्ववान आणि निरागस मनाचा मामा लाभला आहे. प्रत्येकाची मनापासून काळजी घेणारा असा भाऊ आजच्या युगात दुर्मिळ आहे, असे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या, तर भव्य मंडपातील अनेकांचे डोळेही पाणावले.

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी १९९२ साली स्थापन केलेल्या ममता बाल सदन संस्थेत आजपर्यंत तब्बल २२० मुलींची थाटामाटात लग्ने लावून दिली आहेत. या सर्व लेकी आज आपल्या संसारात सुखाने नांदत असून माईंच्या कुटुंबात आज २२० लेक-जावयांचा मोठा परिवार निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेनुसार तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या अधिक मासाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. याच परंपरेचे जतन करत माईंच्या संस्थेने अधिक मासाचे वाण – माईंच्या लेकजावयांचा सन्मान हा उपक्रम राबविला. या सोहळ्यासाठी लेकी व त्यांच्या जावयांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी जावयांना नवीन पोशाख, तर लेकींना साडी-चोळी, जोडवे (बिचवे), तामणदीप, निरंजन, ३३ अनारसे आणि तुळशीचे रोप अशा पारंपरिक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. ज्या प्रेमाने आणि आदराने प्रत्येक वडील अधिक मासात आपल्या लेकीला घरी बोलावून तिचा सन्मान करतात, त्याच संस्कृतीचे पालन करत 'बापमाणूस' म्हणून दीपकदादा गायकवाड यांनी माईंची परंपरा जिवंत ठेवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ममता बाल सदन (बालगृह)चे अध्यक्ष दीपक गायकवाड होते. यावेळी सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुणभाऊ सपकाळ, लामा फेरा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सत्येंद्र शुक्ला, शर्मिष्ठा जाधव, अनुश्री रिसवाडकर, शास्वती रिसवाडकर, बजरंग वाघ, चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ. संजय रावळ, डॉ. दिलीप वाघोलीकर, डॉ. वांढेकर, डॉ. शेट्टी, अनिकेत खरे, पूजा खरे आणि शीतल सिनगारे, विनय सपकाळ, मनीष बोपटे, देविदास अरबट आदी मान्यवर उपस्थित होते. सोहळ्यासाठी सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मानपत्र आणि तुळशीचे रोप देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ममता बाल सदन संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. माईंच्या विचारांची, संस्कारांची आणि ममतेची परंपरा आजही तितक्याच ताकदीने पुढे चालत असल्याचे हे भावस्पर्शी चित्र पाहून उपस्थित प्रत्येकाचे मन भारावून गेले.

### वारजेतील लॉजवर पोलिसांचा छापा; वेश्याव्यवसायातून अल्पवयीन मुलीसह महिलेची सुटका

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मुंबई-बंगळूर महामार्गावरील वारजे परिसरातील एका लॉजवर छापा टाकून गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयू) वेश्याव्यवसायातून एका अल्पवयीन मुलीसह महिलेची सुटका केली. या प्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या एका महिला एजंटला अटक करण्यात आली आहे. आश्लेषा सचिन सोमनकर (वय ३४, सध्या रा. वारजे; मूळ रा. माहीम, मुंबई) असे आरोपीचे नाव आहे. तिच्याविरुद्ध वारजे पोलिस ठाण्यात लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'साई एक्झिक्युटिव्ह लॉजिंग अँड बोर्डिंग' येथे महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक छगन कापसे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर गुरुवारी (ता. ४) रात्री अचानक छापा टाकला.

# खंडणीसाठी जीवघेणा हल्ला करणाऱ्या चौधरी टोळीवर मोक्का; आठ जणांविरुद्ध कठोर कारवाई

## तलवारीने खूनाचा प्रयत्न, घरात घुसून मारहाण व महिन्याला १५ हजारांची खंडणी मागितल्याप्रकरणी कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील चौधरी मळा परिसरात खंडणीसाठी जीवघेणा हल्ला, घरावर दगडफेक आणि धमकावल्याप्रकरणी कुख्यात चौधरी टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी या टोळीतील आठ जणांविरुद्ध मोक्का लागू करण्यास मंजुरी दिली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास काष्टी येथील चौधरी मळा परिसरात ही घटना घडली होती. टोळीप्रमुख सुभाष कोंडीबा चौधरी, वैभव सुभाष चौधरी, साई संजय मदने व त्यांच्या साथीदारांनी चारचाकी आणि दुचाकी वाहनांवरून येत फिर्यादीच्या घरावर दगडफेक केली. यावेळी सुभाष चौधरी याने तलवारीच्या साहाय्याने फिर्यादीवर जीवघेणा हल्ला करून खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. मात्र फिर्यादीने प्रसंगावधान राखून वार चुकविल्याने त्यांचा जीव वाचला.

यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करून त्यांच्या आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच या ठिकाणी राहायचे असेल तर दरमहा १५ हजार रुपये द्यावे लागतील, अशी धमकी देत खंडणीची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलीसांनी सुभाष कोंडीबा चौधरी (टोळीप्रमुख), वैभव सुभाष चौधरी आणि साई संजय मदने या तिघांना अटक केली. या आरोपींविरुद्ध यापूर्वीही श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत खंडणी, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, मालमत्ता बळकावणे, घातक शस्त्रांसह धमकावणे, शासकीय कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्यापासून रोखणे, हद्दपारी आदेशाचे उल्लंघन करणे आदी गंभीर स्वरूपाचे तब्बल १८ गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी आरोपींविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर केला होता. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर विशेष पोलीस महानिरीक्षकांनी सुभाष चौधरी, वैभव चौधरी, साई मदने यांच्यासह सुजित इथापे, मयूर गव्हाणे, नितीन गव्हाणे, नितीन पवार आणि चिंगा भागवत या आरोपींविरुद्ध मोक्का कायद्याअंतर्गत वाढीव कलमे लावण्यास मंजुरी दिली.

## स्वस्तात सोने देण्याचे आमिष; लुटारू टोळीचा पर्दाफाश ५ आरोपींकडून २६ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर,** स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून नागरिकांना जाळ्यात ओढत लुटमार करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, स्विफ्ट कार व बनावट सोन्याची नाणी असा २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी अविनाश अनिल नलावडे (रा. सणसवाडी, जि. रायगड) यांना आरोपींनी स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून विश्वासात घेतले. ४ जून रोजी बुरुगाव शिवारातील रेल्वे उड्डाणपुलाजवळ बोलावून त्यांच्यासह साथीदारांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण करण्यात आली. त्यानंतर रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे ५२ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून नेण्यात आला.

या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातून शिवाजी उर्फ शिवा मोहिते, राजू उर्फ चंदू मोहिते, अक्षय उर्फ आकाश मोहिते, छगन मोहिते व दिनेश जाधव यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून १६ लाख ५० हजार रुपये रोख, १ लाख ९० हजारांचे सोन्याचे दागिने, ८ लाखांची स्विफ्ट कार तसेच बनावट सोन्याची नाणी जप्त करण्यात आली आहेत. आरोपींना पुढील तपासासाठी अहिल्यानगर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

## विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या कौशल्य शिक्षण चळवळीचा दोन दशकांचा प्रवास उलगडणार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यात कौशल्ये, आत्मविश्वास आणि करिअरविषयक स्पष्टता निर्माण करण्यासाठी गेली दोन दशके कार्यरत असलेल्या 'लेंड अ हॅण्ड इंडिया' (लाही) या संस्थेच्या कार्याचा गौरव सोहळा मंगळवारी (ता. ९) सायंकाळी ५.३० वाजता पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. या गौरव सोहळ्यास महाराष्ट्राचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि उद्योजक प्रतापराव पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमातून संस्थेच्या २० वर्षांच्या कौशल्य शिक्षण चळवळीचा प्रवास आणि त्याचा लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर झालेला परिणाम उलगडला जाणार असल्याची माहिती संस्थेच्या संस्थापक सुनंदा माने आणि राज गिल्डा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिलिंद माने म्हणाले, "सन २००६ मध्ये महाराष्ट्रातील अवघ्या १०० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेली ही चळवळ आज देशातील २० हून अधिक राज्य सरकारे, शिक्षण मंडळे आणि शिक्षण विभागांपर्यंत पोहोचली आहे. शालेय शिक्षण आणि उपजीविकेच्या संधी यांतील दरी कमी



करण्यासाठी कौशल्य शिक्षणाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम 'लाही'ने केले आहे. आज संस्थेच्या माध्यमातून हजारो शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्य शिक्षण पोहोचत आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना ज्ञान मिळते; मात्र प्रत्यक्ष जीवनात त्याचा उपयोग कसा करायचा, हे शिकण्याची संधी मर्यादित असते. 'लर्निंग बाय डुईंग' अर्थात 'करून शिकणे' या संकल्पनेवर आधारित कौशल्य शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समस्या सोडविण्याची क्षमता, संवाद कौशल्ये आणि आत्मविश्वास विकसित करते. त्यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण आणि जीवनाभिमुख बनते."

## नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू होणार; आमदार विवेक कोल्हे यांच्या मागणीला यश

■ जनप्रवास वार्ताहर

**पुणतांबा :** कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसह राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू करण्याची मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह एन सी सी एफ व नाफेडकडे केली होती त्यास सकारात्मक प्रतिसाद देत या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत हमीभावाने कांदा खरेदीस मान्यता दिली आहे

याबद्दल आमदार कोल्हे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले आहे. महाराष्ट्र राज्यात कांद्याच्या बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. उत्पादन खर्च वाढत असताना मिळणारा कमी दर शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला होता. या पार्श्वभूमीवर आमदार कोल्हे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती.

मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश



दिल्यानंतर हमीभावाने कांदा खरेदीची प्रक्रिया सुरू झाली आहे. नाफेड आणि एनसीसीएफची कांदा खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीमधून होणार आहे.

नाफेड व एनसीसीएफकडून बाजार समिती आवारातील खरेदीसाठीचे बाजार शुल्क माफ होणार असून सरकारी कांदा खरेदीसाठी असलेल्या जाचक अटी आणि शर्तींमध्ये सुधारणा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.त्यामुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत होणार असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या निर्णयामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून आ कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश आल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

## आयुर्वेद चौक, अमरधाम रोड येथे स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ उत्साहात संपन्न

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. नागरिकांमध्ये वृक्षांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार व्हावा आणि प्रत्येक घरापर्यंत हिरवाई पोहोचावी या उद्देशाने आयुर्वेद चौक, अमरधाम रोड येथे सुरू करण्यात आलेल्या स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ आयुर्वेद शास्त्र शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप यांच्या हस्ते उत्साहपूर्ण



वातावरणात संपन्न झाला.

यावेळी बोलताना ॲड. सचिन जगताप म्हणाले की, आजच्या घडीला शहरांमध्ये हरित क्षेत्राचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. वाढते नागरीकरण, काँक्रीटीकरण आणि पर्यावरणातील बदल यामुळे वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना वृक्षांचे महत्त्व समजून देण्यासाठी आणि वृक्षारोपणाची आवड निर्माण करण्यासाठी आधुनिक सुविधांनी युक्त हायटेक नर्सरीची आवश्यकता आहे. या नर्सरीमध्ये सर्व प्रकारची फळझाडे, देशी वृक्ष, फुलझाडे तसेच पर्यावरणपूरक विविध रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांना केवळ रोपे खरेदीच करता येणार नाहीत, तर निसर्गाचा आनंद घेत पर्यावरण संवर्धनाची प्रेरणाही मिळणार आहे.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू झालेली ही नर्सरी भविष्यात पर्यावरण जनजागृतीचे केंद्र ठरेल. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची सवय नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीने पुढाकार घ्यावा. निसर्ग आणि पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या नर्सरीकडून अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

## मका पिकाकरिता वढाणे येथे शेतीशाळा संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**बारामती :** महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), पुणे अंतर्गत बारामती तालुक्यातील मौजे वढाणे येथे सन २०२६-२७ मधील नैसर्गिक शेती शेतकरी शेतीशाळा (पीक -मका) यांच्या प्रथम वर्गाचे आयोजन करण्यात आले.

सदरील शेती शाळेमध्ये शेतकरी निवड, बीज प्रक्रिया, बिजामृत निर्मिती तसेच मका पिकाच्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगविषयी माऊली सहकारी शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित कुतवळ यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी मंडळ कृषी अधिकारी चंद्रकांत मासाळ व उप कृषी अधिकारी प्रशांत मोरे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना आत्माचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक गणेश जाधव यांनी केली. कार्यक्रमाचे नियोजन तसेच आभार प्रदर्शन सहाय्यक कृषी अधिकारी प्रवीण चांदगुडे यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट बँक मेसेज पाठवून ४१ लाखांची फसवणूक; दोन जण अटकेत

## पाचही स्वीफ्ट डिझायर गाड्या पोलिसांनी केल्या जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर, प्रतिनिधी : नामांकित चारचाकी वाहनांच्या शोरुमची बनावट बँक मेसेज, खोटे णढळ नंबर आणि न वटणारे धनादेश वापरून ४१ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन भामट्यांना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून फसवणुकीत मिळविलेल्या पाचही स्वीफ्ट डिझायर टी-परमिट गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

पवन गुरुनाथ पांडव (वय ३८) आणि संतोष त्रिंबक दळवी (वय ४४, दोघे रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी जानेवारी २०२६ मध्ये महालक्ष्मी ऑटोमोटिव्ह मारुती सुझुकी शोरुममधून पाच नवीन स्वीफ्ट डिझायर गाड्या खरेदी केल्या. यासाठी त्यांनी सुमारे ४१ लाख रुपये ऑनलाइन भरल्याचे भासवण्यासाठी बनावट बँक मेसेज व णढळ नंबर शोरुमला पाठवले. त्यानंतर संबंधित वाहनांची डिलिव्हरीही घेतली.

मात्र शोरुमच्या खात्याची पडताळणी करताना संबंधित रक्कम जमा न झाल्याचे उघड झाले. आरोपींनी नंतर दिलेले धनादेशही खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने वटले नाहीत. दरम्यान, आरोपींनी काही गाड्या विकल्याचेही समोर आले. त्यामुळे शोरुम व्यवस्थापनाने कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर सहाय्यक पोलीस



निरीक्षक तेजश्री थोरात यांनी तपास सुरू केला. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडी मिळवली. तपासादरम्यान पाचही स्वीफ्ट डिझायर गाड्या जप्त करण्यात पोलिसांना यश आले.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी वाहन विक्री शोरुम व्यवस्थापनाला ऑनलाइन व्यवहार, आरटीजीएस, डीडी किंवा धनादेशाद्वारे पेमेंट झाल्यानंतर रक्कम खात्यात जमा झाल्याची खात्री करूनच वाहनांची डिलिव्हरी देण्याचे आवाहन केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.


# सर्पदंशाने सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्या मंदाकिनी वडवकर यांचे निधन

## घराच्या पडवीत झोपेत असताना नागाचा दंश; उपचारादरम्यान मृत्यू, श्रीगोंद्यासह परिसरात शोककळा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादितच्या माजी उपाध्यक्षा तथा विद्यमान संचालिका मंदाकिनी सूर्यकांत वडवकर यांचे शनिवारी मध्यरात्री सर्पदंशामुळे दुर्दैवी निधन झाले. या घटनेमुळे श्रीगोंदा शहरासह परिसरात शोककळा पसरली असून सहकार, सामाजिक व कृषी क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

मंदाकिनी वडवकर या श्रीगोंदा-वेळू रोडवरील वडवकर वस्ती येथे वास्तव्यास होत्या. सहकार क्षेत्रातील सक्रिय कार्यकर्त्या म्हणून त्यांची ओळख होती. शेतकरी





कुटुंबातील असलेल्या वडवकर यांनी शेतीसोबतच सामाजिक व सहकारी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले होते. त्यांच्या पश्चात पती सुर्यकांत वडवकर, एक मुलगा, दोन मुली, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची तिन्ही अपत्ये विवाहित आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री सुमारे सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास त्या आपल्या घराच्या पडवीत झोपल्या होत्या. त्यांच्या शेजारी पती सूर्यकांत वडवकर हेही विश्रांती घेत होते. याच वेळी अचानक एका नागाने त्यांच्या हाताच्या दंडावर दंश केला. दंश होताच त्या मोठ्याने ओरडल्याने पती जागे झाले. त्यांनी पाहिले असता नाग सरपटत पडवीतील धान्याच्या गोण्यांखाली जाऊन लपल्याचे निदर्शनास आले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कुटुंबीयांनी त्यांना तातडीने श्रीगोंद्यातील पाटील हॉस्पिटलमध्ये दाखल केले. प्राथमिक तपासणीनंतर अधिक उपचारासाठी त्यांना दौंड येथील लक्ष्मी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

मंदाकिनी वडवकर यांच्या निधनाची बातमी समजताच कुटुंबीयांनी एकच हंबरडा फोडला. परिसरात शोककळा पसरली असून अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनीही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

दरम्यान, दंश केल्यानंतर धान्याच्या गोण्यांखाली लपलेल्या नागाला परिसरातील नागरिकांनी शोधून ठार केले. दंश करणारा नाग ठार केल्यानंतर त्याची ओळख निश्चित करण्यासाठी तो दवाखान्यात नेण्यात आल्याची माहिती मिळाली. या घटनेमुळे ग्रामीण भागात सर्पदंशाविषयी पुन्हा एकदा चिंता व्यक्त होत आहे.

रविवारी दुपारी वडवकर वस्ती येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, महिला वर्ग, नातेवाईक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक परंपरेनुसार दंश करणाऱ्या नागाचाही अंत्यसंस्कार जवळच करण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

## जुना कापड बाजार परिसरातील कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहराच्या मध्यवर्ती भागातील जुना कापड बाजार परिसरातील बहुप्रतीक्षित कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. नगरसेवक अविनाश घुले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे हे काम मंजूर झाले असून माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून हे काम होत आहे.

या कामामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या समस्या दूर होणार आहेत. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर या विकासकामाला प्रारंभ झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शुभारंभ कार्यक्रमाला उपमहापौर धनंजय जाधव, प्रशांत मुथा, किशोर डागवले, मनोज लोंढे, रोहन डागवाले , श्रीकांत बोरा, राजेंद्र तातेड, कमलेश मुथा, ललित पारीख , मयूर पारीख ,राजेंद्र मिसाळ, जितेंद्र बोरा , राजेश झालनी , अजहर पटवेकर, दर्शन शहा, स्वप्नील गांधी, अभय बोरा यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत परिसराच्या विकासासाठी आणखी कामे होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

- महापालिकेच्या वतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन
- छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य समाजाला प्रेरणा, ऊर्जा आणि स्वाभिमान देणारे - महापौर ज्योतीताई गाडे
- राज्याभिषेकामुळे मराठी अस्मितेला मिळाले नवे बळ; शिवरायांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करून स्वराज्याच्या आदर्शांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महापौर ज्योतीताई गाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय असे रयतेचे राज्य निर्माण केले. समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे, महिलांचा सन्मान राखणे, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला न्याय देणे तसेच सर्व धर्मांचा आदर राखत सुशासन निर्माण करणे हा शिवरायांच्या राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. त्यामुळेच आजही त्यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आदर्श मानले जाते.

त्या पुढे म्हणाल्या की, रायगड किल्ल्यावर पार पडलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हा केवळ एका राजाचा राज्याभिषेक नव्हता, तर तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा, आत्मसन्मानाचा आणि स्वातंत्र्याच्या विचारांचा विजय होता. राज्याभिषेकामुळे मराठी अस्मितेला नवे बळ मिळाले आणि स्वराज्याची संकल्पना अधिक मजबूत झाली. शिवरायांनी उभे केलेले स्वराज्य हे न्याय, समानता, शौर्य आणि लोकहित या मूल्यांवर आधारित होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजाला नवी दिशा देणारे आहे.

## अवतार मेहेर बाबा ट्रस्टच्या कामगारांना तीन वर्षांत ४,८०० रुपयांची वेतनवाढ

### नवीन वेतन करारावर युनियन आणि ट्रस्टमध्ये सहमती; बोनसही वाढला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन आणि अवतार मेहेर बाबा ट्रस्ट यांच्यात नवीन वेतनवाढ करारावर बुधवारी (दि. ४ जून) शिक्कामोर्तब झाले. सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारामुळे पुढील तीन वर्षांसाठी कामगारांच्या वेतनात वाढ तसेच विविध सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

सन २०२३ ते २०२६ या कालावधीतील करार संपुष्टात आल्यानंतर नवीन करारासाठी संघटना आणि ट्रस्ट यांच्यात अनेक फेऱ्यांच्या चर्चा झाल्या. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कोणताही औद्योगिक वाद न होता तडजोडीने करार करण्यात आला.

नवीन करारानुसार सन २०२६ ते २०२९ या कालावधीत कामगारांना एकूण ४,८०० रुपयांची वेतनवाढ मिळणार आहे. ही वाढ दरवर्षी १,६०० रुपये या प्रमाणे टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार आहे. तसेच दिवाळी बोनस



आणि भेट रक्कम मिळून पूर्वीपेक्षा १,५०० रुपयांची वाढ करण्यात आली असून आता कामगारांना ९,५०० रुपयांचा बोनस मिळणार आहे. कामगारांच्या कुटुंबीयांच्या शैक्षणिक गरजांचाही विचार करण्यात आला असून कर्मचाऱ्यांच्या मुलांना पात्रतेनुसार १२ हजार रुपयांपर्यंत शैक्षणिक सहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय पूर्वीचे सर्व लाभ कायम ठेवण्यात आले आहेत. करारावर ट्रस्टच्या वतीने विश्वस्त रमेश जंगले, तर युनियनच्या वतीने कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर, कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे आणि युनिट अध्यक्ष सतीश पवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी व्यवस्थापन व कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे लोकार्पण

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**बारामती :** बारामती आगारात नव्याने दाखल करण्यात झालेल्या १० 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील पायाभूत सुविधा विकासाला नेहमीच प्राधान्य दिले. त्यापैकीच एक आणि देशात मॉडेल बनलेल्या बारामती बसस्थानकाचा परिसर, बसमधील स्वच्छता राखणे, बस वेळेवर सोडण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन



महामंडळाने (एसटी) भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानक येथे आयोजित एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे, विभागीय कामगार अधिकारी सचिन भुजबळ, आगार व्यवस्थापक प्रविण शिंदे, माजी सहाय्यक वाहतूक अधिक्षक घनश्याम सदाशिव शिंदे. यांच्यासह महामंडळाचे कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानकाला रुपये १ कोटींचे बक्षीस आणि स्मृतिचिन्ह मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीकोनातून बारामती तालुक्यात विविध विकास कामे पूर्ण झाली आहेत.

# भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी : डॉ. गो. बं. देगलूरकर

### 'सुवर्णद्वीप' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन; इंडोनेशियातील भारतीय संस्कृतीच्या वारशावर प्रकाश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी असल्याचे उत्तम उदाहरण इंडोनेशिया या देशावरून दिसून येते. आम्ही धर्माने मुस्लिम असलो. तरी संस्कृतीने हिंदू आहोत, असे इंडोनेशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अभिमानाने सांगितल्याचे ज्येष्ठ पुरातत्व तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी नमूद केले.

प्राचीन इंडोनेशियातील हिंदू-बौद्ध संस्कृती, परंपरा आणि राजसत्तेचा इतिहास उलगडणाऱ्या 'सुवर्णद्वीप : हिंदू बुद्धीस्ट किंग्डम्स् ऑफ एन्शंट इंडोनेशिया' या पुस्तकाचे प्रकाशन भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट येथे आयसीएचआरचे माजी अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते आणि डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरू डॉ. गो. बं.देगलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पुस्तकाच्या लेखिका संगीता चाफेकर आणि ऋता उंबरजे, डॉ. अंबरीष खरे, विभा ओक, प्रकाशक पराग पुरंदरे आदि मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावाची अनेक उदाहरणे दिली. इंडोनेशियातील सांस्कृतिक जीवनात रामायण आणि महाभारत आजही जिवंत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी महर्षी अगस्तींच्या इंडोनेशियातील कार्याचा तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या इंडोनेशियाशी संबंधित आठवणींचाही उल्लेख केला.

डॉ. जामखेडकर यांनी इंडोनेशियातील मंदिरांबद्दल लोकांच्या मनात आजही असलेली पावित्र्याची भावना अधोरेखित केली. इस्लामधर्मीय बहुसंख्य देश असूनही तेथील हिंदू मंदिरांचे संवर्धन आणि जतन करण्यात आले आहे. दक्षिण-पूर्व आशियातील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाचा अभ्यास करताना काही पाश्चात्त्य इतिहासकारांनी या प्रदेशाला 'इंडियनाइज्ड स्टेट्स ऑफ साउथ-ईस्ट एशिया' असे संबोधल्याचा उल्लेख त्यांनी केला.

संगीता चाफेकर यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीचा प्रसार हा आक्रमणातून नव्हे तर व्यापार, धर्म, तत्त्वज्ञान, कला आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीद्वारे झाला. भारतीय व्यापारी आणि विद्वानांनी आग्नेय आशियात विचार व परंपरा पोहोचवल्या. स्थानिक संस्कृतींसोबत झालेल्या संवादातून तेथे एक स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा विकसित झाली. भारतीय संस्कृती ही संवाद साधणारी असून ती कोणावरही लादली जात नाही, असे त्यांनी नमूद केले.

ऋता उंबरजे यांनी जावा आणि बाली बेटांवरील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाची उदाहरणे दिली. रामायण, महाभारत आणि पुराणकथांतील मूळ भारतीय संकल्पना स्थानिक समाजाने स्वीकारून आपल्या सांस्कृतिक



संदर्भात त्यांचे रूपांतर केले. पात्रांची नावे आणि काही तपशील बदलले असले तरी मूळ विचार भारतीय असल्याचे त्यांनी सांगितले. जावा येथील मंदिरांमध्ये रामायणाचे भव्य शिल्परूप दर्शन घडते, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. अंबरीष खरे यांनी इंडोनेशियाचा अभ्यास करताना तेथील भाषा, कला, स्थापत्य, शिलालेख, इतिहास आणि भूगोलाचा सखोल अभ्यास केल्याचे सांगितले. इंडोनेशियामध्ये आजही भारतीय संस्कृतीचा प्रभाव अनेक ठिकाणी जाणवतो. देशाचे राष्ट्रीय प्रतीक 'गरुड' असून त्यावरूनच राष्ट्रीय विमानसेवा 'गरुडा'चे नाव ठेवण्यात आले आहे. इस्लाम धर्म स्वीकारलेल्या अनेक कुटुंबांमध्येही हिंदू परंपरेबद्दल आदरभाव असून भगवद्गीतेसारख्या ग्रंथांची ओळख नव्या पिढीला करून दिली जाते, असे त्यांनी सांगितले.

कंबुज पुस्तकाच्या मराठी अनुवादक विभा ओक यांनी भारतीय संस्कृती, कला आणि स्थापत्याचा आशियातील व्यापक वारसा अधोरेखित केला. दोन्ही लेखिकांनी विषयाचा सखोल अभ्यास करून पुस्तक लिहिले असून अनुवाद करताना प्राचीन भाषांतील शब्दांचे अचूक अर्थ आणि उच्चार समजून घेणे आव्हानात्मक होते, असे त्यांनी सांगितले. मराठी वाचक या पुस्तकाच्या अनुवादाची आतुरतेने वाट पाहत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी शहाणे यांनी केले.

# विद्यापीठे, उद्योग आणि संशोधन संस्थांमध्ये भागीदारीची गरज

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे प्रतिपादन; हिंदू इकॉनॉमिक फोरम आयोजित 'शक्ती समिट २०२६'चा समारोप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** "उच्च आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता असून, केवळ पदवीधर नव्हे, तर भावी संशोधक, उद्योजक आणि राष्ट्रनिर्माते घडविण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर आहे. यासाठी विद्यापीठे, उद्योग आणि विविध आर्थिक मंचांमध्ये सखोल सहकार्य आणि भागीदारीची गरज आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

हिंदू इकॉनॉमिक फोरम (एचईएफ) पुणे डिस्ट्रिक्ट चॅप्टरच्या वतीने आयोजित पहिल्या 'शक्ती समिट २०२६', उद्योजकता परिषदेचा समारोप राज्यपाल वर्मा यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी लेफ्ट. जनरल (निवृत्त) अजयकुमार सिंग, क्विन्टेसेंशियल फ्रॅग्रन्स प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष भरत कामठे, अ‍ॅक्युरेट ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक किरण जाधव, हिंदू इकॉनॉमिक फोरमचे अध्यक्ष गौरव त्रिपाठी, संकेत खरपुडे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाचे सदस्य दीपक करंजीकर, भारत फोर्जचे राजेंद्रसिंग भाटिया यांच्या हस्ते समिटचे उद्घाटन झाले.

'शक्ती समिट'चे कौतुक करीत जिष्णू देव वर्मा म्हणाले, "हे




व्यासपीठ उद्योजक, गुंतवणूकदार, संशोधक, स्टार्टअप, लघुउद्योग, धोरणकर्ते आणि विचारवंत यांना एकत्र आणून भारताच्या आर्थिक आणि धोरणात्मक विकासासाठी दिशा देणारे आहे. 'धोरणात्मक क्षेत्रांतील संधी' ही नवीन भारताच्या आकांक्षांचे प्रतीक आहे. आत्मविश्वासू, आत्मनिर्भर, तंत्रज्ञानसंपन्न आणि सांस्कृतिक मूल्यांशी जोडलेला भारत उभारण्यासाठी ज्ञान, नावीन्य, संघटनशक्ती, उद्यमशीलता आणि शिस्त यांचे सामर्थ्य राष्ट्रीय हिताशी जोडणे आवश्यक आहे. जगभरात सुरू असलेले संघर्ष, बदलणारे भू-राजकीय समीकरण आणि जागतिक पुरवठा साखळीतील बदल यामुळे भारतासमोर मोठ्या संधी निर्माण होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, अवकाश, रोबोटिक्स, प्रगत उत्पादन, ऊर्जा, आरोग्य आणि डिजिटल अर्थव्यवस्था ही आता केवळ उदयोन्मुख क्षेत्रे नसून राष्ट्रीय सामर्थ्याची प्रमुख आधारस्तंभ ठरत आहे." छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपूर्तीचे स्मरण करत राज्यपाल वर्मा म्हणाले, "भारताने आत्मनिर्भरता, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि धोरणात्मक सामर्थ्याच्या बळावर विकसित राष्ट्र बनण्याचा संकल्प अधिक दृढ करावा.

शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य उभे केले, त्याच धर्तीवर आजच्या भारताने नवसंशोधन, उद्योग आणि राष्ट्रीय बांधिलकीच्या बळावर जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करावी. संत, समाजसुधारक, योद्धे, उद्योगपती, शास्त्रज्ञ आणि विचारवंतांची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राने देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ज्ञान, शिक्षण, संस्कृती, आयटी, ऑटोमोबाईल उद्योग, संरक्षण आस्थापना, संशोधन संस्था आणि औषधनिर्माण क्षेत्रातील मजबूत पायाभूत सुविधांमुळे पुणे हे धोरणात्मक उद्योगांचे राष्ट्रीय केंद्र बनण्याची क्षमता आहे."

# ईच्छा गरजेइतक्या असतील तरच पुर्ततेचा आनंद

अनावश्यक आशा-आकांक्षांना दूर सारुन मोजक्याच आणि गरजे इतक्या अपेक्षा मनात बाळगल्या, तर त्यांच्या पूर्ततेचा आनंद तुम्हाला सुख-समाधान मिळवून देईल. आपल्या डोईवरचा नको तो भार खाली ठेवून जितके उचलता येईल तितकेच डोईवर ठेवून चालण्याचा प्रयत्न करा.

हे माझं, ते माझं, सारंच माझं..या म्हणण्याला काहीच अर्थ नाही. ही बिनकामाची ओझी वाहण्यातही काही मजा नाही. 'माझं माझं अन् भ्रांतीचं ओझं' ही उक्ती लक्षात ठेवून आपण या जगात वावरलं पाहिजे. आपण आपल्या अपेक्षा इतरांवर लादणं म्हणजे आपल्या डोईचा भार दुसऱ्याच्या डोईवर ठेवण्यासारखं आहे.



या आशा- आकांक्षा इच्छांतूनच मग द्वेष-मत्सर, गर्व वाढीस लागतो, ज्यांचं ओझं आपल्याला सहन होत नाही. म्हणून सर्वांत पहिल्यांदा गरजेपेक्षा जास्त इच्छा बाळगण्याची सवय दूर करा. चिंता, नैराश्य, ताणतणाव यांच्या अनपेक्षित येण्याचे मूळ कारणच या अपेक्षांच्या ओझ्यांमध्ये दडलेले आहे. प्रत्येकाला आपले जीवन जगण्याचा अधिकार आहे.

व्यक्तिस्वातंत्र्य आहे. इतरांवर अपेक्षांचे ओझे लादून आपण त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ नये. अशाने, पश्चात्तापाशिवाय शेवटी काहीच हाती लागत नाही. घरातल्यांचे आजार, मुलांच्या अभ्यासाचे टेन्शन, आर्थिक चणचण या सर्व गोष्टी प्रत्येक कुटुंबात असतातच. त्या सर्वांचे ओझं आपल्या डोक्यावर घेऊन फिरण्याने त्यांना भोगावी लागणारी दुःखं कमी होणार आहेत का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असे माहीत असूनही, आपण विनाकारण साऱ्या जगाचं दुःख करीत बसतो आणि नाहक काळजी,चिंता, ताणतणाव ओढवून घेतो. अर्थात, याचा दुष्परिणाम दुसऱ्या कुणाला नाही, तर आपला आपल्यालाच भोगावा लागतो. प्रत्येकाला एका ठरावीक मर्यादेपर्यंत वावरण्याची, जीवन जगण्याची मोकळीक देऊन आपण एक पालक बनून, मार्गदर्शक बनून, राहिल्यास आपल्याला कोणत्याही प्रकारची चिंता वा काळजी करावी लागणार नाही. उलट, तुमच्या अपेक्षेपेक्षाही दुपटीने तुम्ही सुखाचा आनंद उपभोगू शकाल.

इतरांबद्दलची नाहक काळजी करत बसण्याने त्यांच्यात काहीच फरक पडत नसतो. पण, आपल्याला मात्र मानसिक शारीरिक आजारांना सामोरे जावे लागते, त्याचे काय? त्यामुळे या सर्व अनावश्यक आशा आकांक्षाना दूर सारुन मोजक्याच आणि गरजेइतक्या अपेक्षा मनात धरल्यात, तर त्यांच्या पूर्ततेचा आनंद तुम्हाला सुख-समाधान मिळवून देईल. आपल्या डोईवरचा नको तो भार खाली ठेवून जितके उचलता येईल तितकेच डोईवर ठेवून चालण्याचा प्रयत्न करा. अशाने, तुमची दमछाक होणार नाही आणि जीवनप्रवासात कुठला अडथळा येणार नाही.

डोईजड होण्याइतपत उचललेलं ओझं आपल्याला खाली पाडतं. त्यामुळे ते पहिल्यांदा हलके करण्याचा प्रयत्न करा. अनावश्यक काळजी, चिंता यांना सोबत घेऊन फिरण्यापेक्षा गरजेपुरत्याच अपेक्षा कशा पूर्ण करता येतील, यावर भर द्या.

# वृध्दांची काळजी घेऊन त्यांना आधार द्या ...



आल्यानंतर पुन्हा जात नाही, ते म्हातारपण आणि गेल्यानंतर परत येत नाही ते यौवन! तरुणपणातील चुका मनुष्याला शहाण्या करतात, पण म्हातारपणातील चुका मात्र पंगू बनवतात. सांगण्याचा हेतू हा की, उतारवयात स्वत:च स्वत:ला जपा. कुठं धडपडला, पडलात तर हाड मोडेल. ते सांधायला खूप वेळ लागतो. फार कष्टदायक काळ असतो. मरणाच्या वेदना होतात.

बालपण ते तारुण्य या दरम्यान आपली हाडं लवचित असतात. ती लगेच तुटत नाहीत, पण वय वाढेल तसं त्यात काठिण्य येतं आणि जराशा आघातानं ती मोडू शकतात. उतारवयात हाडं कमजोर झालेली असतात आणि हे कमजोर हाड मोडलं की कित्येक महिने अंथरुणावर पडून रहावं लागतं. याचा परिणाम म्हणून चमडी काळवंडते, रक्त साठून राहिल्याने नसा फुगतात. पाय सुजतो. वृध्दांचे बहुधा मांडीचे वा मनगटाचे हाड मोडताना दिसते.

वय वाढलं की, वृध्दांनी हातात काठी घ्यावी हे उत्तम. परंतु काही वृध्दांना काठीची लाज वाटते म्हणून ते काठी घेत नाहीत. जे काठी वापरतात त्यांचे अपघाताचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी होते.

वय वाढू लागते आणि मोतीबिंदू होतो. त्या कारणाने नजर कमी होते व अपघात घडतो. वृध्दांच्या खोलीत मंद जळणारा बल्ब न लावता प्रकाशमान बल्ब लावावा म्हणजे ते फर्निचरला वा भिंतीला आपटणार नाहीत. जे वृध्द चष्मा वापरतात ते कुठंतरी चष्मा काढून ठेवतात. पण चष्मा कुठं ठेवला आहे ते आठवत नाही. तसेच चष्म्याच्या वापरामुळे त्यांना जवळचे किंवा लांबचे दिसण्यात फरक पडलेला असतो. तेही अपघातग्रस्त होत असतात. ६० वर्षांनंतर दर सहा महिन्यांनी डोळे तपासणी करुन घ्यावी व चष्म्याच्या काचा बदलाव्यात.

वृध्दपणात उठणे-बसणे सहजशक्य होत नसते. वृध्द मोरीत वा संडासात बसतेवेळी हमखास धडपडतात. भिजलेला साबण, तेलकट फरशी त्यांच्या वाटेत असू नये. तसेच वृध्दांना हाताने धरता येईल, अशी एक दोरी त्यांच्या खाटेजवळ लावावी, म्हणजे त्याला धरुन ते उठतील व बसतील. वृध्दांचा कंटाळा सर्वजण करतात, परंतु ते अपघातात सापडून हाडं मोडून घेऊ नये यासाठी त्यांची काळजी घ्या. जर का ते अपघाती होऊन खाटेवर पडले, तर त्यांच करतात करता तुमची दमछाक होईल.

# कपडे असे निवडा की जाड असूनही दिसाल सुंदर

परफेक्ट अॅण्ड फिट, उपयुक्त ज्वेलरी, योग्य मेकअप आणि हेयरस्टाईल असेल तर तुम्ही देखील दिसाल स्टायलीश, मग तुम्ही कितीही जाड्या का असेना ! फॅशनेबल दिसण्यासाठी आवश्यकता आहे ती केवळ योग्य सिलेक्शनची तुम्ही कितीही जाड्या किंवा लठ्ठ असा पण तरीदेखील इतर अनेक सुंदर स्त्रियांप्रमाणे तुम्ही देखील सुंदर आणि फॅशनेबल दिसू शकता. पण त्यासाठी तुम्हाला आम्ही सांगितलेले हे काही उपाय अवलंबावे लागतील मग पाहा तुम्ही असाल एकदम कॉन्फिडंट आणि ट्रेंडीदेखील.

* मोनोक्रोमॅटिक कलर म्हणजे एकाच रंगाचे कपडे तुम्हाला स्लिमर लुक देतील. नेव्ही ब्ल्यू, ऑलिव्ह ऑईल, व्हायोलेट, चॉकलेट ब्राऊन, प्लम आणि बरगंडी कलर तुम्हाला शोभून दिसेल. काळा रंग हा जाड लोकांना स्लिम दिसण्यासाठी परफेक्ट कलर आहे.

* जर तुम्ही सूट वापरत असाल तर जॅकेट आणि पँटचा कलर एकच असावा, हे लक्षात ठेवा. मग तो कलर कोणत्याही शेडचा असो. संपूर्ण ड्रेस एकाच शेडचा असेल तर तो शरीराला स्लीमर लुक देतो. जर तुम्ही खाकी रंगाची पँट घातलेली असेल तर त्याच शेडचा स्वेटर घाला. वाटल्यास तुम्ही कॉन्ट्रास्ट टॉपदेखील घालू शकता. बस केवळ रंगाची निवड योग्य असली पाहिजे.

* नेहमी आपल्या शरीराचा आकार लक्षात ठेवूनच ड्रेस खरेदी करा. फिटिंगचे ड्रेस वापरा, ड्रेस खरेदी करुन त्यात स्वत:ला फिट करण्याचा प्रयत्न करु नका.



* पँट्स घालताना तिचा फॉल चांगला असावा हे लक्षात घ्या. तो पिंडऱ्या किंवा जांघेच्या मागच्या भागाला तंग होतोय, असे असू नये याचप्रमाणे स्कर्टची निवड करतानादेखील या फॉलचे ध्यान ठेवा.

* स्कर्ट अशा प्रकारे घाला की, तुमचं पोट वाईट दिसू नये. काही महिला अगदी शौक म्हणून स्कर्ट घालतात पण पोटावरील अतिरिक्त चरबीमुळे पोटाचा खालचा भाग बाहर आलेला दिसतो. हे अगदीच वाईट दिसते.

* ब्लाऊज वापरताना अशी काळजी घ्या की, बटनांच्या मधली गॅप नजरेस पडणार नाही.

* तुम्ही कितीही लठ्ठ असला तरी ड्रेस खरेदी करताना फिटिंग नेहमी लक्षात घ्या. जास्त टाईट कपड्यांमध्ये तुम्ही आणखीनच लठ दिसाली.

* जाड महिलांनी ज्वेलरीदेखील मोठीच घातली पाहिजे. पातळ व डेलीकेट चेन आणि ब्रेसलेट घालू नका. हेवी ज्वेलरी, मोठ्या आकाराचे पेंडेंट लांब नेकलेस, जाड ब्रेसलेट किंवा बांगड्या तुम्हाला बॅलन्स लुक देईल. नीटेड आइटफिटस कधीही वापरु नका. त्याने तुमचे थुलथुलीत भाग आणखीनच प्रदर्शित होतील.

* जर तुम्ही आपले हेवी ब्रेस्ट लपवू इच्छित असाल तर स्टोल घालू शकता.

* हाफ किंवा बंद गळयाचा ड्रेस घालू नका. त्याने ब्रेस्ट (स्तने) आणखीच भारी दिसू लागतात.

* स्लीव्हलेस तर घालूच नका. त्याऐवजी थ्री फोर्थ किंवा फुल लेंग्थ स्लीप वापरा.

# ध्येयापासून भटकू नका..

जीवनात आपले उद्दिष्ट ठरविण्यासाठी सर्वांत पहिल्यांदा त्या उद्दिष्टाची ओळख करुन घेणे जरुरीचे असते. आपल्या उद्दिष्ट्रांची निवड ही आपल्या व्यक्तिमत्वाला साजेशी अशीच असावी. आपले लक्ष्य कागदावर नोंद करुन ते प्राप्त करण्यासाठी निश्चित कालावधी ठरवून घ्यावा. मोठमोठी उद्दिष्टे लहान-लहान उद्दिष्टांमध्ये विभागून कार्य करत राहिल्यास ती सहजपणे प्राप्त करता येऊ शकतात.



लक्ष्य प्राप्तीनंतर आपली स्वप्नं पूर्ण करण्याकरिता अग्रेसर रहावे. आपले लक्ष्य अथवा उद्दिष्ट आणि त्यापासून साधली जाणारी आपली प्रगती यांचे वेळोवेळी समीक्षण करत रहावे. सतत नवनवीन लक्ष्य ठरवावीत.

* दीर्घकालीन लक्ष्य- जी लक्ष्य वा उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाच किंवा दहा वर्षांचा कालावधी लागतो ती दीर्घकालीन लक्ष्य म्हणून समजावीत आपण नेमके कोणत्या दिशेने प्रवास करत आहोत हे निश्चित करण्यासाठी अशी दीर्घकालीन प्रकारातील लक्ष्य आपली मदत करतात.

* मध्यमकालीन लक्ष्य वा ध्येय- आपल्या दीर्घकालीन ध्येयांची आपण काहीशी कमी कालावधीमधील कितीतरी ध्येयांमध्ये विभागणी करु शकतो. पुढील सहा महिन्यांत किंवा एक वर्षाच्या कालावधीत पार करु शकणारी ध्येये या मध्यमकालीन ध्येय प्रकारात समाविष्ट करावीत. मात्र, या विभागलेल्या ध्येयांचा आपल्या दीर्घकालीन ध्येयांशी संबंध टिकून आहे की नाही, हे मात्र वेळोवेळी तपासून पहावे.

* अल्पकालीन ध्येय- दीर्घकालीन आणि मध्यम कालीन ध्येये आठवडा किंवा महिन्याच्या मुदतीत विभाजित केली, तर अशी ध्येये पूर्ण करताना खूपच सोपे जाते. आपल्या मर्यादा आणि आपली ताकद पाहता ज्या ध्येयांना आपण प्राप्त करु इच्छितो, ती आपण मिळवणारच हे निश्चित करावे.

एक मनुष्य म्हणून आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपण आपली जितकी ताकद पणाला लावू शकतो तितकी लावून ते ध्येय वा उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपला दृढनिश्चय मात्र असायला हवा.

* ध्येयापासून भटकू नका- जे लक्ष्य व उद्दिष्ट निश्चित केलंय त्यापासून भटकू नका. त्यावर ठाम रहा. ते ध्येय पूर्ण करण्यासाठी ज्या काही उपाययोजना आखल्या आहेत, त्यांचे पालन अत्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करा. अशावेळी आपल्या मनात भ्रम निर्माण होण्याची शक्यता जास्त असते आणि हाच भ्रम आपल्याला आपल्या उद्दिष्टांपासून दूर करण्यास कारणभूत ठरु शकतो, परंतू कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत आपण आपले लक्ष्य वाऱ्यावर सोडणार नाही, हा संकल्प मनामध्ये घेऊनच कार्यमग्न रहा. आपले लक्ष्य एकदा का निश्चित झाले की, आपली दिशा ही आपल्या ध्येयाकडे नेणारीच असली पाहिजे. इकडे-तिकडे भटकल्याने केवळ वेळ वाया जाईल बाकी काहीही हाती लागणार नाही. लक्ष्य ठरविल्यानंतर आपणच आपल्याला शिस्त लावून घेऊन तिचे काटेकोरपणे पालन केल्यास लक्ष्यापासून भटकण्याची वेळ आपल्यावर कधीच येणार नाही.

# मिठास बोलण्यातून संवाद साधा

ज्यांना माधुर्ययुक्त बोलणं साधतं, ते थेट हृदयात उतरतात आणि अशा बोलण्याबरोबर आदब असेल, तर जानसे प्यारे बनतात.

कसं बोलावं, किती बोलावं, विषयाला धरून कसं बोलावं, बोलता बोलता विनोद कसा करावा ही एक कला आहे. उत्कृष्ट लिहिणारे उत्कृष्ट बोलू शकतील असं नसतं. तसंच मिठास बोलणारा उत्कृष्टपणे लिहू शकेल असंही नसतं. दोन्ही कला साधलेले एकमेव आचार्य अत्रे होते.



आपण रोजच बोलत असतो, पण बोलण्यातून मोहिनी टाकण्याची कला किती जणांना साधते ? ते काही जादूटोणा करत नाहीत, पण शब्दातून फुलं उधळत राहतात. चिमटेही घेतात, पण ते रेशमी असतात.

दोन-तीन व्यक्ती जेव्हा भेटतात तेव्हा एकमेकांची हसत हसत ख्याली खुशाली विचारतात, त्यातील एकाने जरी रडगाने सुरु केले की, एकजण 'मला काम आहे' म्हणून सटकतो. याचा अर्थ असा की, भेटलेल्यास कधीही रडगाणे ऐकवू नये. तसेच एकट्यानेच बडबडत राहायचे व एक-दोघांनी नुसते ऐकायचे हासुध्दा निरोगी संवाद होऊ शकत नाही. बोलण्याची संधी दुसऱ्यालाही दिली पाहिजे.

वक्त्याला समाधीटपणा आवश्यक असतो, तसेच त्याला चेहरा वाचण्याची कलाही अवगत असायला हवी. आपल्या बोलण्यावर कोण हसत नसेल, दाद देत नसेल तर, उगा गळा फाडण्याला अर्थ नसतो. सभेचा वा मैफलीचा नूर पाहून बोलावे. मधुबालेच्या सौंदर्याबद्दल बोला असे कोणी म्हटले आणि जर तिच्या शोकदायी मृत्युबद्दल बोलू लागलो तर, दुधात मिठाचा खडा पडल्यासारखे होईल. बोलताना कधीही इकडे तिकडे पाहात बोलू नये. ऐकणाऱ्यांचे चेहरे वाचतच बोललं पाहिजे आणि कुठं थांबलं पाहिजे हेसुध्दा ध्यानात ठेवायला हवे. कोऱ्या कागदाला जसा अर्थ नसतो, तसेच मख्ख चेहऱ्यालाही अर्थ नसतो. जेव्हा बोलाल तेव्हा त्या मुखातील शब्दांचे भाव चेहऱ्यावर दिसले पाहिजेत. आवाजातून उत्साह, स्फूर्ती दिसायला हवी. कोणत्या बाजारात काय विकायचं याचं भान कसा विक्रेता ठेवतो, तसेच बोलणाऱ्याने शब्द निवडायला हवेत. व्हॅलेंटाईन डे च्या मैफिलीत 'चल उड जा रे पंछी अब ये देश हुवा बेगाना' हे गाणं गाऊन चालेल का ? एका बँडवाल्याने लग्नाच्या वरातीत 'दिल के अरमाँ, आँसूओं मे बह गएऽऽ' गाणं वाजवलं आणि मार खाल्ला होता. म्हणजेच काय तर कुठं काय बोलायचं, कसं आणि केवढं बोलायचं याचं भान ठेवून बोला.

# हास्यविनोद

* **महेश :** बाबा, कसलीही चिंता केल्यास तब्बेत बिघडते ना?

**वडील :** हो बरोबर.

**महेश :** म्हणून हल्ली मी अभ्यासाची चिंता करीत नाही.

* बसंती काकू, शामराव काकांनी त्याच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मुद्दाम डीव्हीडी प्लेअर आणला आणि दोघांचा आवडत्या शोलेची डीव्हीडी आणली. नातू चिंटूबरोबर दोघांनी पिक्चर मस्त एन्जॉय केला. चित्रपट संपल्यावर काका एकदम जुन्या आठवणींत रमले. कांकूकडे पहात रंगात येत म्हणाले, नाच बसंती नाच. काकू लाजून काही तरी बोलणार तोच चिंटू जीवाच्या आकांताने ओरडला. बसंती.. इस कुत्ते के सामने मत नाच.

* **अनिल :** अगं मिनाक्षी, आपला बाळ्या फार हुशार आहे हं! अक्कल माझ्याजवळनं उचलली आहे बेट्यानं!'

**मिनाक्षी :** खरंच, तुमच्याच जवळची सगळी उचलली आहे. माझी आहे माझ्याजवळ शिल्लक!

* **अजय :** तू जर मला नकार दिलास तर जगातील कोणत्याच मुलीवर मी प्रेम करणार नाही.

**काजोल :** आणि समजा मी होकार दिला तर?

* सकाळच्या वेळी एक हेलिकॉप्टर शहरावर घिरट्या घालत होते.

**रामदास :** सकाळ-संध्याकाळ कोणाचे हेलिकॉप्टर घिरट्या घालतंय रे?

**गुरुदास :** संबंधित अधिकारी शहरातील रोडवरील लाईट बंद केली का नाही ते पाहतात.

■■■

# हस्ताक्षर सांगतो खरेखोटेपणा

एखादा आरोपी किंवा व्यक्ती खरे बोलते आहे की खोटे, हे तिच्या हस्ताक्षरावरून शोधून काढण्याचे तंत्रज्ञान हैफा युनिव्हर्सिटीतील शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. एखादा माणूस सत्य आणि मनःस्थिती लपवून सराईतपणे खोटे बोलू शकतो, तो तितक्याच सराईतपणे खोटे लिहूही शकतो; परंतु खोटे आणि खरे लिहिताना अक्षरात अगदी नैसर्गिकपणे आणि लिहिणाऱ्याच्याही नकळत बदल होत असतो.

खोटे लिहिताना अक्षरांचे फर्राटे आणि लेखणीने कागदावर पडणाऱ्या दाबाच्या प्रमाणात नकळतपणे बदल होत असतो आणि अक्षरातील हे बदल शोधून काढूनच एखादी व्यक्ती त्यावेळी खोटे बोलते आहे का, खोटे लिहिते आहे का, हे अचूकपणे शोधून काढता येते, असे विश्लेषण या शास्त्रज्ञांनी केले आहे.

# सहा तासांपेक्षा कमी झोप नको...

लवकर श्रीमंत होण्याची, प्रसिद्धी मिळविण्याची व जीवनाच्या सर्व सुखांचा उपभोग घेण्याचा अट्टाहास यामुळे माणसाची झोप उडाली आहे. आजकाल कोणीच पुरेशी झोप घेत नाही. त्यामुळे आरोग्यही चांगले राहत नाही.

प्रत्येकाने रोज रात्री कमीत कमी ६ तास झोप घेतलीच पाहिजे कारण या पेक्षा कमी झोप घेतल्यास त्या व्यक्तीचा लवकर मृत्यू होण्याची शक्यता असते असे ताज्या संशोधनातून निष्पन्न झाले आहे.

अमेरिका व इटलीच्या शास्त्रज्ञांनी इग्लंड, अमेरिका व युरोपियन तसेच पूर्व आशियातील देशात २५ वर्षे विविध प्रकारे १६ अध्ययन करुन उपरोक्त निष्कर्ष काढला आहे.


या अध्ययनात १३ लाखांपेक्षा जास्त लोकांचा समावेश करण्यात आला होता. याशिवाय एक लाख लोकांच्या मृत्यूची माहिती गोळा करण्यात आली होती. या अध्ययनाचा निष्कर्ष असा की, ६ तासांपेक्षा कमी झोप हे लवकर मृत्यू येण्याचा संदेशच आहे.

सर्वसाधारणपणे एका व्यक्तीला ६ ते ८ तास झोप घेणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे जास्त झोपल्यास शरीराचे नुकसान होते. त्याचप्रमाणे कमी झोपसुद्धा आरोग्याच्या दृष्टीने नुकसानकारकच आहे. कमी झोप झाल्यास लवकर मृत्यू होण्याची शक्यता १२ टक्के वाढते असा या शास्त्रज्ञांनी दावा केला आहे.

# मुलांचे दात पडतेवेळी...

खरे तर मुलांचे दात निघत असताना पालक अधिक चिंतीत असतात. मुलांच्या जन्माच्या वेळी जबड्याच्या हाडांमध्ये वीस प्रायमरी दात असतात. पुढील दोन-अडीच वर्षात हे दात निघू लागतात. साधारणपणे मुलांना पहिला दात आल्यावर माता-पिता खूष होतात. मुलांना पहिला दात आल्यानंतर सुरुवातीपासूनच त्यांच्या दातांच्या सफाईकडे लक्ष पुरविणे जरूरी असते. यासाठी मऊ टूथब्रशचा उपयोग करणे उचित आहे.

काही लोकांचे म्हणणे असे की, पहिला दात निघाल्यावर मुलांना ताप येतो, परंतु तसे नाही. दात निघताना मुलाला ताप आल्यास अशावेळी डॉक्टरांना दाखवून घ्यावे. याचबरोबर आपले मूल ब्रश करत असताना त्यावर लक्ष ठेवावे. जेणेकरून तोंडामध्ये जखम होऊ नये. त्यास हळूवारपणे ब्रश करण्याची सवय जडवावी. याबाबत आपला सहयोग महत्वपूर्ण ठरतो. कित्येक लोक असे मानतात की, गोड कॅन्डी आणि चॉकलेट खाण्याने मुलांचे दात खराब होतात. खरे तर स्नॅक्स खाण्यानेही दातांचे जितके नुकसान होते, तितकेच चॉकलेट खाण्याने मुलांचे दात खराब होतात. खरे तर स्नॅक्स खाण्याने दातांचे जितके नुकसान होते, तितकेच चॉकलेट व कॅन्डी खाल्ल्यानेही होते. तोंडातील बॅक्टेरियामुळे दातांमध्ये कॅव्हिटीज होते.



आपण घेतलेल्या अन्नपदार्थांचे कण दातांमध्ये तसेच दातांवर जमा होऊन त्यात बॅक्टेरिया उत्पन्न होऊ शकतात. असे जमा झालेले अन्नपदार्थातील बॅक्टेरियामुळे तोंडात आम्ल उत्पन्न होते. या कारणाने दातांमध्ये कॅव्हिटी होते. म्हणूनच कॅव्हिटीला कारणीभूत ठरणाऱ्या ब्रेड, चिप्स, लोणी यांसारख्या कार्बोहायडेट्रसयुक्त पदार्थापासून मुलांना शक्यतो दूर ठेवावे. किशमिश खाण्यानेही मुलांच्या दातांचे नुकसान होऊ शकते. म्हणूनच मुलांच्या दातांबाबत सावधानी जरूरी आहे.

# पोटाचा कॅन्सर झाल्यावर दिसतात ही भयंकर ६ लक्षणं, दुर्लक्ष केलं तर मृत्यू अटळच

सामान्यतः पोटात होणारी जळजळ, अपचन, अशक्तपणा याकडे आपण रोजच्या आयुष्याचा भाग समजून दुर्लक्ष करतो. मात्र, हेच लक्षणं एखाद्या गंभीर आजाराचे सूचक संकेत ठरू शकतात, याची कल्पनाही आपल्याला नसते. सध्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे पोटाच्या कर्करोगाच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. या आजाराचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीला त्याची कोणतीही स्पष्ट लक्षणं दिसून येत नाहीत. म्हणूनच तो अनेक वेळा शेवटच्या टप्प्यावरच लक्षात येतो आणि उपचारांची संधी कमी होते.

विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती अशक्त वाटत असते, वजन अचानक घटतं, किंवा जेवणात रस राहत नाही, तेव्हा यामागे केवळ थकवा नसून काहीतरी गंभीर असू शकतं. पोटाचा कर्करोग योग्य वेळी ओळखला, तर त्यावर उपचार शक्य असतात. म्हणून आज आपण जाणून घेणार आहोत अशा काही सुरुवातीच्या लक्षणांबद्दल, जी साधी वाटत असली तरी तुम्हाला वेळेवर सावध करू शकतात.

**अपचन आणि ॲसिडिटी वारंवार होणे**

सतत गॅसेस होणे, पोटात जळजळ, जेवण झाल्यावर अपचन आणि पोटफुगी ही लक्षणं फारच सामान्य वाटतात. पण ही समस्या काही आठवडे किंवा महिने सतत टिकून राहिल्यास ती पोटाच्या आतील थरांवर वाढणाऱ्या असामान्य पेशींमुळे म्हणजेच कर्करोगामुळे उद्‌भवलेली असू शकते. काही वेळा यासोबतच गॅसेस होऊन मानेकडे ॲसिड चढणं, छातीत दुखणं किंवा उलट्या होणे यासारख्या समस्याही जाणवतात. तुम्ही सतत औषधं घेत असूनही आराम मिळत नसेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणं टाळू नका.

**थोडं खाल्लं तरी लगेच पोट भरल्यासारखं वाटतंय?**

सामान्यतः भूक लागणे, अन्नावर ताव मारणे आणि पोट भरल्यासारखं वाटणे ही स्वाभाविक प्रक्रिया असते. पण काही वेळा थोडंसंच खाल्ल्यानंतर पोट जड वाटणं, किंवा अन्न बघूनच उबग येणं, ही लक्षणं देखील पोटातील अनैसर्गिक वाढीचं संकेत ठरतात. हे विशेषतः



तेव्हा घडतं जेव्हा ट्यूमर पोटाच्या आत जागा व्यापायला लागतो आणि अन्न पचवण्याची नैसर्गिक प्रक्रिया मंदावते. त्यामुळे तुमची भूक कमी झाली आहे का, याकडे नियमित लक्ष देणं महत्त्वाचं आहे.

**डाएट न करता वजन झपाट्याने कमी होतंय? सावध व्हा!**

वजन कमी करणं ही काही वेळा आपली उद्दिष्ट असते, पण जेव्हा कोणताही प्रयत्न न करता, डाएट किंवा वर्कआउटशिवायच वजन वेगाने कमी होऊ लागतं तेव्हा ते कर्करोगासारख्या गंभीर आजाराचं लक्षण असू शकतं. कर्करोगाच्या पेशी शरीरातील ऊर्जेचा अधिक वापर करतात आणि शरीराची चयापचय क्रिया बदलतात. त्यामुळे शरीर जास्त थकतं, मांसपेशी कमी होतात आणि वजन झपाट्याने घसरतं. तुम्हालाही अशा प्रकारचं अनुभवायला मिळालं असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय चाचणी आवश्यक आहे.

**वारंवार मळमळ आणि खाल्ल्यानंतर उलटी येते?**

जर तुम्हाला जेवणानंतर थोड्याच वेळात मळमळ होणे, उलटी होणे किंवा अन्न नीट पचत नसेल, तर ही समस्या पाचनशक्तीच्या पलीकडची असू शकते. पोटाच्या पृष्ठभागावर होणाऱ्या पेशींच्या अस्वस्थ वाढीमुळे पाचन प्रक्रियेमध्ये अडथळा येतो. हे लक्षण जास्त स्पष्टपणे त्या व्यक्तींमध्ये दिसून येते ज्यांना आधी अशी समस्या कधीही नव्हती. खासकरून सतत उलट्या होणं, किंवा उलटीत रक्त दिसणं ही लक्षणं अजिबात दुर्लक्षित करु नयेत.

**पचनाच्या तक्रारींबरोबर थकवा आणि रक्तक्षयही जाणवतो का?**

काही वेळा पोटाच्या कर्करोगामुळे आतून हळूहळू रक्तस्त्राव होत राहतो आणि यामुळे रक्ताल्पता (ॲनिमिया) निर्माण होते. तुम्हाला सतत थकवा जाणवतोय, चक्कर येतेय, कामात लक्ष लागत नाही – आणि त्याचबरोबर वरील कोणतंही लक्षण असेल, तर तपासणी अत्यावश्यक आहे. शरीरात हळूहळू घडणाऱ्या या बदलांमुळे, पचन फक्त अडथळीत राहत नाही, तर संपूर्ण शरीराची ताकदही कमी होते. त्यामुळे केवळ पोटाचे आजार म्हणून समजून घेण्याऐवजी, हे लक्षणं एकत्र पाहून योग्य वैद्यकीय निदान गरजेचं ठरतं.

टिप : हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

# लहान मुलाला बरोबर घेऊन मोटार चालवताना खबरदारी घ्या

सध्या दोन्ही पालक कमावते असण्याऱ्या जमान्यात बहुतेकांकडे मोटार असते. मोटार ही आता चैनीची वस्तू राहिली नसून, गरजेची गोष्ट झाली आहे. या गोष्टीला काहीच हरकत नाही. मात्र लहान मुलांना घेऊन मोटारप्रवास करताना तरुण जोडप्यांनी खूप खबरदारी घ्यायला हवी.

जेव्हा तीव्र वेगात येणाऱ्या दोन मोटारींची टक्कर होते तेव्हा लहान मूल मागे बसले असेल, तर फार सावधगिरी हवी. गाडीतला प्रवासी डॅश बोर्डवर आपटला, तर तो लहान असो की मोठा, मृत्यूचं भय असतंच.

अशा परिस्थितीत मुलगा पुढच्या सीटवर बसला असेल, तर बरं होईल, विंड स्क्रीन सीटवर बसला असेल, तर बरं होईल. विंड फोडून त्याला बाहेरे काढता येईल. अपघाताची आधी कल्पना येणें अशक्यच असतं. आजच्या जमान्यात अपघात घडणारच, असं समजून प्रतिबंधक काळजी घेणं महत्वाचं आहे. त्यानुसार मुलाला ड्रायव्हरशेजारी सीटवर बसवलत, तर त्याला सेफ्टी बेल्ट बांधायला विसरु नये.



मात्र त्या सीटवर बसणाऱ्या प्रौढ व्यक्तीनं बेल्ट बांधला असेल आणि तो मुलाला मांडीवर घेणार असेल, तर त्यानं फार काळजी घेतली पाहिजे. दुर्दैवाने अपघात घडला, तर बेल्ट बांधलेली व्यक्ती लहान मुलाला मदत करु शकत नाही, असा अनुभव आहे.

भरधाव गाडी दुसऱ्या गाडीला अथवा खांबाला किंवा कठड्याला धडकली, तर लहान मुलाचं वजन आपोआप ३० पट वाढतं. या स्थितीत अपघाताच्या वेळी प्रौढ माणसं त्याला मदत करु शकत नाहीत. मुलाला मागच्या सीटवर बसवताना अशा रीतीने बसवा, की टक्कर झाली तर त्याला मोठ्याचं संरक्षण मिळेल. अन्यथा दोन प्रौढांच्यामध्ये सापडल्यामुळे मुलांचा मृत्यू झाल्याच्या केसेस पुष्कळ आढळतात.

मुलाला बेल्ट बांधून पुढच्या सीटवर बसवण्यापेक्षा बेल्ट बांधून मागच्या सीटवर बसवणं बरं. मात्र मागच्या सीटवर बेल्ट बांधून बसण्याची सोय नसेल, तर बेल्टसह पुढच्या सीटवर बसवणं आवश्यक आहे.

पुढच्या सीटवर मुलाला कोणत्याही परिस्थितीत बेल्टशिवाय बसवू नका. तो मोटारीया गिअर्सपासून बटणांपर्यंत सर्वत्र हात लावून गाडी सुरु करु शकतो हे सदैवर लक्षात असू द्या.

बऱ्याचदा अपघातांमध्ये गाडीवर किंवा मोठ्यांच्या अंगावर एक ओरखडाही उठत नाही, पण लहान मुल मात्र मृत्युमुखी पडतं. बहुतेकदा मुलाचं डोकं डॅशबोर्डवर आपटल्यामुळे हे होतं. ही शक्यता लक्षात घेऊन मुलाला गाडीत योग्य जागी बसवा.

ब्रिटनमधल्या एका संशोधनानुसार, गाडी फक्त २५ कि.मी. वेगानं जात असली, पण मुलगा बेल्टशिवाय पुढच्या सीटवर बसलेला असेल, तर एखाद्या धक्क्यामुळे तो जोरात डॅशबोर्डवर आदळू शकतो. यावेळी त्याला बसलेला धक्का दुसऱ्या मजल्यावरुन पडल्यास जेवढा धक्का बसेल, तितका तीव्र असतो.

सामान ठेवण्याच्या जागेत मुलाला कधीही बसवू नका. अपघाताच्या वेळी सामान अंगावर पडून मुलगा जखमी अथवा मृत होण्याचा धोका असतो. चालत्या गाडीतून हात किंवा डोकं बाहेर काढणं, येणाऱ्या जाणाऱ्यांना हात करणं वगैरे गोष्टी मुलांना करु देऊ नका. ड्रायव्हरनं अचानक ब्रेक लावल्यास मुलगा खाली पडून गंभीर जखमी होण्याची शक्यता आहे.

गाडी पार्क करुन मुलाला एकटं गाडीत ठेवून जाऊ नका. गाडीत तुमच्याबरोबर अन्य कुणी असेल, तरच मुलाला गाडीत ठेवा. एकटा असताना तो ब्रेक, गिअर, व्हील, किल्ल्या यांच्याशी खेळून काहीतरी घोटाळा करील व स्वत:चा जीव धोक्यात घालील. गाडीत सिगारेट, लायटर काड्यापेटी अशा वस्तू याच कारणाकरता ठेवू नका.

# वजन कमी करा, वय वाढवा!

जर तुम्ही लठ्ठ असाल आणि वजन कमी करायचे असेल तर ते आता फार कठीण काम राहिलेले नाही, वजन कमी करण्यासाठी लोक कडक उपास करतात, काही लोकं गरजेपेक्षा जास्त व्यायाम करतात, पण हे दोघेही प्रकार न करता मध्यम मार्गाचा अनुकरण करायला पाहिजे.

**जरूरी टिप्स :** जेवण आणि व्यायामामध्ये संतुलन कायम ठेवणे फारच गरजेचे आहे, अन्यथा कुठल्याही प्रकारचा व्यायाम फलदायी ठरणार नाही. मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी खाद्य पदार्थांवर लक्ष्य देण्यापेक्षा आपले मन दुसरीकडे वळवणे जरूरी आहे. पाण्याचे सेवन जास्तीत जास्त करावे.

**डाइटवर कंट्रोल करणे :** सर्वप्रथम भोजनाची मात्रा कमी करून जेवणात सलाडाचा वापर करावा. स्पायसी व गरीष्ठ भोज्यपदार्थ खाण्याऐवजी ब्रोककली, कॅबिज आणि दुसऱ्या प्रकारचे सलाड खायला पाहिजे. दोन पोळ्यांची भूक नेहमी ठेवावी आणि दिवसातून दोन वेळा जेवण करायला पाहिजे बाकी वेळेस काहीही खाणे टाळावे. जेवण केल्यानंतर अर्धा तासाने पाणी प्यायला पाहिजे.

**व्यायाम :** जर पोहता येत असेल तर त्यासारखा दुसरा कुठला ही व्यायाम नसतो. पण पोहता येत नसेल तर मॉर्निंग वॉकसाठी एखाद्या बगिच्यात किंवा शांत वातावरणात जायला पाहिजे. आणि जर हे ही शक्य नसेल तर योगा करायला पाहिजे. पोहणं आणि पायी पायी चालणेसुद्धा योगाचाच एक रूप आहे.

**योगा टिप्स :** योगा ट्रेनरकडून शिकून सूर्य नमस्कार, त्रिकोणासन, कटिचक्रासन, अर्धमत्स्येंद्रासन, भुजंगासन, मत्स्यासन, हलासन, चक्रासन आणि हनुमानासन किंवा आंजनेय आसन करायला पाहिजे. जेवणाची मात्रा कमी करून नियमित योगा केल्याने नक्कीच तुमचे वजन कमी होण्यास मदत मिळेल.

■■■

# कोणते पदार्थ पुन्हा गरम करू नये? वाचा 'ही' यादी; नाहीतर तब्येतीसाठी ठरेल घातक

अनेकदा भूक नसेल म्हणून किंवा अगदी मित्र-मैत्रिणींना भेटायचा प्लॅन झाला की आपण काहीतरी खाऊन मगच घरी येतो. मग घरी आल्यावर पुन्हा जेवणाची इच्छा होत नाही, त्यामुळे वारंवार उरलेले अन्न फेकून देण्याऐवजी आपण दुसऱ्या दिवशी ते पुन्हा गरम करून खातो. पण, तुम्हाला माहिती आहे का की, काही पदार्थ पुन्हा गरम केल्याने ते विषारीसुद्धा बनू शकतात? त्या निवडक पदार्थांमध्ये असलेला पोषक घटक नष्ट होण्याव्यतिरिक्त, वारंवार गरम केल्याने कधीकधी कर्करोगासारखे आजार विकसित होऊ शकतात, त्यामुळे कोणते पदार्थ गरम करावे आणि कोणते पदार्थ गरम करू नये, याबद्दल माहीत असणेसुद्धा आवश्यक आहे.

**चहा**

चहा पुन्हा पुन्हा गरम करणे आरोग्यासाठी खूप हानिकारक असू शकते. त्यात असलेले टॅनिन आणि फ्लेव्होनॉइड्स पुन्हा गरम केल्यावर आणखीन वाढतात, ज्यामुळे पोटात गॅस, आम्लता आणि पचनाच्या समस्या उद्‌भवू शकतात. वारंवार चहा गरम केल्याने चहाची चवदेखील कडू आणि तुरट होते, त्यामुळे शरीरात विषारी घटकदेखील वाढू शकतात.

**पालक, बीट आणि मसूर**

पालक, बीट आणि इतर नायट्रेटयुक्त भाज्या कधीही पुन्हा गरम करू नयेत. असे केल्याने त्यामध्ये असलेले नायट्रेटचे, नायट्रोसामाइन्समध्ये रूपांतर होते, जे कर्करोगजन्य मानले जातात; त्यामुळे या भाज्या सहसा ताज्या खायला द्याव्यात, विशेषतः लहान मुले आणि वृद्धांना.



**भात** : जर शिजवलेला भात खोलीच्या तापमानावर बराच वेळ ठेवला आणि नंतर पुन्हा गरम केला तर त्यात बॅसिलस सेरियस नावाचा धोकादायक जीवाणू वाढू शकतो. यामुळे अन्नातून विषबाधा, उलट्या आणि जुलाब होऊ शकतात, म्हणून उरलेला भात ताबडतोब फ्रिजमध्ये ठेवा आणि मर्यादित वेळेत खा.

**पनीर**

पनीर पुन्हा गरम केल्याने त्याचा पोतच खराब होतो असे नाही तर त्यात असलेले प्रथिनेदेखील हानिकारक स्वरूपात बदलू शकतात; यामुळे पचनाच्या समस्या आणि पोटात जळजळ होऊ शकते, त्यामुळे पनीरची भाजी असो किंवा त्याच्यापासून बनवलेला एखादा पदार्थ, तो नेहमी ताजा असतानाच खावा.

**ब्रेड**

जर ब्रेड वारंवार गरम केला तर त्यातील स्टार्च विषारी संयुगांमध्ये बदलू शकतो. मायक्रोवेव्हमध्ये किंवा तव्यावर गरम केलेल्या ब्रेडमुळे शरीराला कोणतेही पोषण मिळत नाही; उलट त्यामुळे अपचन, छातीत जळजळ आणि गॅसची समस्या वाढू शकते.

त्यामुळे निरोगी जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी खाण्याच्या सवयी आणि आपण घेत असलेले अन्न या दोन्ही गोष्टींचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्न वारंवार गरम करणे ही एक सामान्य पद्धत असली तरीही त्यातील थोडासा निष्काळजीपणा दाखवल्यास तुम्हाला गंभीर आरोग्य समस्या होऊ शकतात, त्यामुळे शक्य तितके अन्न खा आणि उरलेले अन्न जास्त काळ साठवून ठेवू नका.

# बाळाला आई डाव्या कुशीतच का घेते ?

कोणतीही आई आपल्या बाळाला डाव्या कुशीत का घेत याचा आपण कधी विचार केला आहे का ? आपण म्हणाला की, उजवा हात कामासाठी मोकळा ठेवण्यासाठी ती असे करीत असेल, पण डावखुऱ्या माताही बाळाला नेहमी डाव्या कुशीतच घेतात त्यांचे काय ?

प्रथम ही आकडेवारी पाहा. उजव्या हाताने काम करणाऱ्या मातांपैकी ८३ टक्के तर डावखुऱ्या मातांपैकी ७८ टक्के माता बाळाला डाव्या कुशीतच घेतात.

याचे सोपे उत्तर म्हणजे बाळ जन्मापूर्वी बाहेरच्या जगतील एक आवाज नेहमी ऐकते व ओळखते. तो आवाज म्हणजे आईची हृदयस्पंदने. डाव्या कुशीत बाळाला घेऊन आई त्याला आपल्या हृदयस्पंदनाजवळ आणत असते. ती ऐकून बाळाला समाधान व आराम वाटतो.

याबाबत मुलांच्या नर्सरीत एक अभ्यासही केला गेला. तेथे प्रथम मानवी हृदयस्पंदनशी मिळता जुजळता आवाज



ऐकवत मुलांना झोपवण्यात आले. नंतर त्या आवाजाशिवाय त्यांना झोपवण्यात आले. त्या आढळून आले की स्पंदनाचा आवाज ऐकून मुले दुप्पट लवकर झोपी गेली होती. त्याचप्रमाणे असेही आढळले की, वडील मुलांना फक्त कुशीत घेण्यावर जास्त लक्ष देत नाहीत. याचाच अर्थ स्त्रिया बालसंगोपनात निसर्गत:च उत्तम असतात. त्या बाळाच्या सुखाबाबत जास्त दक्ष असतात व स्पंदनाचा आवाज बाला जास्त हवाहवासा वाटतो हे जाणत असतात. असाच एक अभ्यास माणसाशी साधर्म्य असणारा गोरीला व चिपांझी या प्राण्यांवरही करण्यात आला. त्यांच्याच डाव्या-उजव्या हातांनी काम करण्याचे कसलेही बंधन नसते तरीही ८४ टक्के मादीत चिंपाझी व ८२ टक्के मादी गोरिला डाव्या कुशीतच आपल्या पिल्लांना घेतात. आणखी एक तर्क आहे. मानवी मेंदूच्या दोन्ही भागांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या असतात. अशावेळी आपल्या बाळाने आपल्या शरीराच्या चांगल्या बाजूकडे राहावे असे आईला वाटते. कारण मानवी चेहऱ्याचा डावा भाग भावना जास्त उत्तमप्रकारे व्यक्त करतो असे समजले जाते. आईला वाटत असते की, बाळाने वर पाहिल्यावर त्याला आईच्या डोळ्यातील भावना व त्यातील दिल व्यवस्थित वाचता यावेत.

आता प्रश्न आहे तो म्हणजे मातांनी ही डाव्या कुशीचा पद्धत कशी शोधली. याचे चकित करणारे उत्तर म्हणजे ही निवड बाळाने स्वत: केली आहे. काही तासांपूर्वी जन्मलेल्या बाळांच्या वागण्याकडे लक्ष दिले तर लक्षात आले की, बाळ या जगात उजवीकडे मान वळविण्याची सवय घेऊनच जन्म घेते. नवजात बाळाची मान जरी हळूवार मधोमध स्थिर केली तरी, ते स्वत:च ती उजवीकडे वळवते, असे ७० टक्के बाळांमध्ये आढळते. स्तनपानावेळी जेव्हा मातांनी ही नैसर्गिक निवड पाहिली तेव्हा त्यांनीही बाळाला डाव्या कुशीत घेण्याचे ठरविले.

# छान छान गोष्टी...

## मनाचा मोठेपणा

एका गावात दिनू नावाचा एक मुलगा होता. तो अत्यंत भित्रा व एकाकी राहणारा होता. दिनू कधी कुणाशी बोलत नसे. मैत्री करत नसे. तो आपल्याच विचारात नेहमी मग्न रहात असे. एकदा गावाबाहेरील मंदिरात एक साधू महाराज आलेले त्याने पाहिले. कधी न बोलणारा दिनू रोज गावाबाहेरील मंदिरात जाऊ लागला. गावच्या लोकांना दिनूच्या या वागण्याचे आश्चर्य वाटले. दिनूने एकदा महाराजांना प्रश्न केला, महाराज जर आपल्यावर कधी दुष्ट व्यक्तींनी हल्ला केला तर आपण काय कराल ? महाराज दिनूला म्हणाले, मी माझ्या मजबूत किल्ल्यात जाऊन बसेन.

दिनूला महाराजांच्या या बोलण्याचे आश्चर्य वाटले. महाराज, तर इथे मंदिरात राहतात आणि त्यांचा मोठा मजबूत किल्ला आहे असे म्हणतात. मग ते इथे का राहतात ? न राहवून त्याने महाराजांना विचारले, महाराज तुमचा मजबूत किल्ला कुठे आहे सांगा पाहू ? महाराज दिनूच्या या प्रश्नावर खूप हसले आणि हृदयावर हात ठेवून म्हणाले, हा बघ हा आहे माझा मजबूत किल्ला. यावर कुणीही हल्ला करु शकत नाही. शरीर एकवेळ नष्ट होईल पण इथे असणारा तो अक्षय आहे हीच माझी सुरक्षा व्यवस्था आहे. ज्ञान हे केव्हाही सर्वश्रेष्ठ असते. ते कुणाला चोरुन नेता येत नाही. उलट दुसऱ्याला ते दिले तर ज्ञानात भरच पडते. मनाचा मोठेपणा मजबूत असेल तर, त्यावर कुणी घाला घालू शकत नाही. मनाचे सामर्थ्य मोठे हेच महाराजांना दिनूला सांगावयाचे होते. आत्मानुभव हाच शेवटी महत्वाचा असतो. संकटे कितीही आली तरी, त्याला घाबरुन जावयाचे नसते.

अज्ञानामुळेच तशी परिस्थिती येते. महाराजांनी किल्ला हा शब्द का वापरला हे दिनूला समजण्याला मग वेळ लागला नाही. महाराजांच्यावरील त्याची श्रद्धा वृद्धींगत झाली.

***तात्पर्य : स्वत:ला जाणणे हीच सुरक्षा. जे स्वत: जवळ आहे त्याची ओळख होणे हाच आत्मानुभव.***

# प्रेमसंबंधांत कधीही विसरू नयेत हे धडे आणि पार्टनरला सांगू नयेत या गोष्टी

नातेसंबंधातील तुमची भूमिका स्पष्टपणे ओळखली नाही, तर तुम्ही कधीही आनंदी किंवा समाधानी राहणार नाही. अर्थात तुम्ही महत्त्वाचे मुद्दे आणि समस्या स्पष्ट बोलून उपस्थित केल्या पाहिजेत, परंतु काही गोष्टी तुम्ही बोलणे टाळले पाहिजे.

हे खरे आहे की घनिष्ठ नातेसंबंधांमध्ये मोकळेपणा आणि योग्य संवादाला महत्त्व आहे. परंतु कधीकधी काही गोष्टींकडे दुर्लक्ष करणे चांगले असते. उल्लेख केलेला मुद्दा किंवा गोष्ट नातेसंबंधात काही अर्थ जोडत नसेल किंवा समोरच्या व्यक्तीला दुखावत असेल, तर ती गोष्ट सोडून देणेच चांगले. प्रत्येक गोष्टीला उपाय किंवा उत्तर नसते. नातेसंबंधातील तुमची भूमिका स्पष्टपणे ओळखू शकत नसाल तर तुम्ही कधीही आनंदी किंवा समाधानी राहणार नाही. अर्थात, तुम्ही महत्त्वाचे मुद्दे आणि समस्या उपस्थित केल्या पाहिजेत, परंतु काही गोष्टी तुम्ही टाळल्या पाहिजेत. आज अशाच टाळता येण्याजोग्या गोष्टी कोणत्या आहेत ते आपण पाहू या.

**तुम्हाला राग येतो अशा त्यांच्या सवयी**

आपण एखाद्या व्यक्तीभोवती थोडा जास्त वेळ घालवतो तेव्हा आपल्याला त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टी लक्षात येऊ लागतात. त्यांना ती सवय किती काळापासून आहे किंवा ते किती काळापासून ते करत आहेत हे महत्त्वाचे नाही, परंतु आम्हाला वाटते की त्यांनी ती सवय लगेच सोडून द्यावी! पहिले म्हणजे, जग तुमच्या इच्छेनुसार काम करणारी यंत्र नाही, दुसरे म्हणजे, ही त्यांची स्वतःची गोष्ट आहे आणि तुम्ही त्यांच्याकडून तुमच्या इच्छेनुसार ते घडवण्याची अपेक्षा करू शकत नाही. तुम्ही ते अजिबात दाखवू नका हे चांगले आहे कारण पुढच्या वेळी तो/ ती तुमच्यासोबत असेल तेव्हा तो/ ती अस्वस्थ होईल.

**एक्सविषयी वाटणाऱ्या फीलिंग्ज्**

भूतकाळातील नात्यातील काही भावना नेहमीच असू शकतात ज्या तुम्ही सोडू शकला नसाल. हे आश्चर्यकारक नाही. परंतु प्रामाणिकपणा आणि चांगला संवाद हा निरोगी नात्याचा पाया असला तरी, पण तुमच्या सध्याच्या जोडीदारासोबत हे शेअर करणे तुमच्यासाठी आणि तुमच्या नात्यासाठी



हानिकारक ठरू शकते. यामुळे तुमच्या जोडीदारात मत्सर, असुरक्षितता आणि वेदना निर्माण होतील. तर हे असं आहे, एकतर तुमच्या माजी प्रियकराच्या/प्रेयसीच्या आठवणी पूर्णपणे काढून टाकल्यानंतरच नवीन नात्यात प्रवेश करा किंवा जर तुम्ही आधीच नवीन नात्यात प्रवेश केला असेल, तर भूतकाळातील आठवणी फक्त आठवणींमध्येच राहू द्या, त्या कोणाशीही शेअर करू नका किंवा त्यांची तुलना करू नका.

**त्यांच्या कुटुंबियाबाबत वाटणाऱ्या खऱ्या भावना**

तुमच्या कुटुंबाबाबतही हेच आहे. कदाचित, कदाचित तुमचे कुटुंब तुमच्या जोडीदाराकडे तुमच्यासारखेच पाहते, पण नेहमीच असे नसते! कधीकधी आपल्या कुटुंबातील सदस्यांचे आपल्या जोडीदाराबद्दल पूर्णपणे वेगळे आणि विरुद्ध मत असते. पण, त्याच गोष्टी शब्दशः परत सांगण्याची गरज नाही, कारण काही भावना आणि शब्द विसरणे कठीण असते. तुमच्या जोडीदाराच्या बाबतीत तुमच्या कुटुंबाचे हृदय कालांतराने बदलू शकते, पण नंतर, तुमचा जोडीदार तुमच्या कुटुंबाला पूर्णपणे स्वीकारू शकणार नाही! म्हणून असे काहीही करू नका.

**तुम्हाला इतर कोणाचं वाटणारं आकर्षण**

याबद्दल सावधगिरी बाळगा, विशेषतः जेव्हा ते त्यांच्या भावंडांपैकी, मैत्रिणीं/मित्रांबद्दल किंवा सहकाऱ्यांबद्दल असेल. कधीकधी लोकांबद्दल आकर्षण असणे स्वाभाविक असले तरी तुमची किंवा तुमच्या जोडीदाराची त्या लोकांशी जवळीक हे धोकादायक बनवू शकते. आणि जर तुमच्या मनात अशा कोणत्याही भावना नसतील आणि त्या फक्त मनोरंजनासाठी असतील, तर अशा परिस्थितीत प्रथम तुमच्याकडे स्वतःबद्दल स्पष्टता असली पाहिजे. दुसरे म्हणजे अनावश्यक गोंधळ टाळण्यासाठी तुम्ही तुमच्या जोडीदाराला हे सर्व तपशीलवार सांगू नये.

**त्यांच्या मित्रमैत्रिणींबद्दल मत**

ज्याप्रमाणे तुम्ही त्याच्या कुटुंबाबद्दल जास्त उघडपणे बोलणे टाळता, त्याचप्रमाणे तुम्ही येथेही संयम बाळगला पाहिजे. जोपर्यंत तो तुमच्या नात्यात किंवा वैयक्तिक आयुष्यात कोणतेही विषारी वर्तन किंवा वातावरण निर्माण करत नाही तोपर्यंत तुम्ही ते सोडून देऊ शकता.तुम्ही तुमच्या जोडीदाराला साध्या आणि मैत्रीपूर्ण स्वरात सांगू शकता की तुम्हाला त्याच्या मित्रांसोबत राहणे आवडत नाही!

## कलाविश्व

### कुटुंबियांचा विरोध असताना कसं जुळलं अशोक सराफ - निवेदिता यांचं लग्न?



मराठी सिनेविश्वातील दिग्गज कलाकार अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांच्या चाहत्यांची संख्या आज फक्त भारतात नाही तर, सातासमुद्रा पार देखील फार मोठी आहे. अशोक आणि निवेदिता सराफ यांनी अनेक सिनेमांमध्ये एकत्र स्क्रिन शेअर केली आणि दोघांच्या जोडीला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं. फक्त ऑनस्क्रिनच नाही तर, ऑफस्क्रिन देखील दोघांनी चाहत्यांना कपल गोल्स दिले. कधीच लग्न करणार नाही असं म्हणणारे अशोक सराफ कधी आणि कसे निवेदिता यांच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकले आणि कसं दोघांचं नातं लग्नापर्यंत पोहोचलं याबद्दल कदाचित फार काही कोणाला माहिती नसेल. अशोक सराफ आणि निवेदिता यांना एकत्र आणण्यासाठी सर्वात मोठी भूमिका बजावली ती म्हणजे अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी

अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांच्या नात्याबद्दल सांगायचं झालं तर, त्यांची जोडी मराठी सिनेविश्वातील एव्हर ग्रीन जोडी आहे. अनेकांना दोघांची लव्हस्टोरी भावते. कुटुंबियांचा विरोध असताना देखील निवेदिता आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या पण लग्न अशोक सराफ यांच्यासोबतच केलं. कुटुंबियांचा विरोध, प्रेमातील अडथळे दूर करत दोघांनी लग्न केलं आणि संसार थाटला. सांगायचं झालं तर, अशोक सराफ जेव्हा नाटक करायचे, तेव्हा निवेदिता सराफ त्यांच्या वडिलांसोबत नाट्यगृहात यायच्या. एवढंच नाही तर, वडिलांमुळे निवेदिता यांची अशोक सराफ यांच्यासोबत ओळख झाली. कालांतराने या ओळखीचं प्रेमात रुपांतर झालं.

जेव्हा अशोक सराफ यांचा अपघात झाला, तेव्हा त्यांनी कधीच लग्न न करण्याचा निर्णय घेतलेला. पण निवेदिता सराफ याचं अशोक यांच्यावर जीव जडलेला होता. त्यांनी कुटुंबियांना देखील सांगून ठेवलं होतं की, लग्न करे तर अशोकशीच करेल', पण दोघांमध्ये १८ वर्षांचं अंतर असल्याने त्यांच्या नात्यासाठी कुटुंबियांचा विरोध होता. पण निवेदिता देखील दुसऱ्या कोणाशीच लग्न करण्यासाठी तयार नव्हत्या. तर अशोक सराफ देखील निवेदिता यांच्या प्रेमात होते. अखेर अभिनेते सचिन पिळगांवकर यांच्या मदतीने दोघांचं लग्न पार पडलं.

अशोक सराफ यांच्यासोबत लग्नाला, कुटुंबियांचा विरोध होता, पण निवेदिता सराफ यांच्या बहिणी देखील दोघांच्या लग्नासाठी पुढाकार घेतला आणि कुटुंबियांची समज घातली. अखेर कुटुंबियांनी देखील निवेदिता आणि अशोक सराफ यांच्या लग्नासाठी होकार दिला. त्यानंतर मंदिरात पारंपरिक पद्धतीने अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांचं लग्न झालं.

### ६१ व्या वर्षी आमिरच्या तिसऱ्या लग्नाबद्दल राखी यांचं रोखठोक मत



बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट' अर्थात अभिनेता आमिर खान तिसरं लग्न करण्यासाठी सज्ज झाला आहे. येत्या ५ जुलै रोजी तो गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. वयाची साठी ओलांडलेल्या आमिरच्या या तिसऱ्या लग्नाबद्दल सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. यावर आता ज्येष्ठ अभिनेत्री राखी गुलजार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ७८ वर्षीय राखी यांनी सांगितलं की, इंडस्ट्रीत जे काही चाललं आहे, त्याबद्दल त्यांना फारशी माहिती नाही, कारण त्या आता तितक्या सक्रिय नाहीत. आमिर खानसोबत त्यांनी कधीही काम केलं नाही. परंतु तो एक चांगला व्यक्ती आहे, असं त्या म्हणाल्या. आमिरने ज्याप्रकारे दोन वेळा लग्न मोडल्यानंतरही त्याच्या दोन्ही पूर्व पत्नींसोबत नातं जसं सांभाळून ठेवलं आहे, त्यावरून त्याच्याविषयी बरंच काही समजतं, असं राखी पुढे म्हणाल्या.

वयाच्या ६१ व्या वर्षी लग्न करण्यावरून आमिर खानवर बरीच टीकासुद्धा होत आहे. मात्र राखी यांनी स्पष्ट मत मांडलं की नात्यांची सोबत आणि आनंद या गोष्टी वयाने ठरवल्या जात नाहीत. व्हरायटी इंडिया'शी बोलताना त्या म्हणाल्या, वयाच्या ६० व्या वर्षी लग्न करण्यात समस्या काय आहे? रॉबर्ट डी नीरोने (हॉलिवूड अभिनेता) दोन वेळा लग्न केलं आणि आता पार्टनर टिफिनी शेनसोबत ते रिलेशनशिपमध्ये आहेत. या दोघांना २०२३ मध्ये एक मुलगीसुद्धा झाली. एका बाळाच्या जन्माच्या वेळी त्यांचं वय ८० पेक्षा जास्त होतं. वैवाहिक जीवनातील आनंद वयावर अवलंबून नसतो. जेव्हा माझं लग्न झालं होतं, तेव्हा गुलजार ४० वर्षांचे होते.

याआधी दिग्दर्शक विक्रम भट्ट यांनीसुद्धा आमिरच्या लग्नाबद्दल आपलं मत व्यक्त केलं. माझ्या मते प्रेम शोधण्यासाठी आणि संसार थाटण्यासाठी वयाची कोणतीही मर्यादा नसते. हे त्यांचं वैयक्तिक आयुष्य आहे आणि ते कसं जगायचं हे ठरवण्याचा अधिकार त्यांना आहे, असं ते म्हणाले. विक्रम यांनी गुलाम' या चित्रपटात आमिरसोबत काम केलं होतं.

आमिरने त्याच्या ६० व्या वाढदिवशी गौरी स्प्रॅटसोबतच्या नात्याची घोषणा केली होती. गेल्या काही महिन्यांपासून गौरी आणि आमिर एकत्रच राहत आहेत. आता हे दोघं लग्न करत या नात्याला एक नवी ओळख देणार आहेत. गौरी ही मूळची बंगळुरूची असून तिला आधीच्या लग्नापासून सहा वर्षांचा मुलगासुद्धा आहे. आमिर आणि गौरीच्या वयात जवळपास १४ वर्षांचं अंतर आहे.

# राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे

## राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थ विक्रेत्यांवर १९५ धाडी



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थांविरुद्धची विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १९२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत राज्यभर १९५ धाडी टाकण्यात आल्या असून या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. भारतीय न्याय संहिताचे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३०(२) (र) आणि कलम ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे.

मोहिमेत ३ जून २०२६ रोजी सोनगीर, जि. धुळे येथे टाकण्यात आलेल्या धाडीत २३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे.

४ जून २०२६ रोजी समृद्धी महामार्गावर सावंगी टोल नाका येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६० लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन तर नांदेड येथे करण्यात आलेल्या धडक कारवाईत १७ लाख ५२ हजार ४५० रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन जप्त करण्यात आले. तसेच मोशी, पिंपरी-चिंचवड येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६ लाख १९ हजार ९८२ रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करून सहा व्यक्तींविरुद्ध चिखली, पिंपरी-चिंचवड या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

५ जून २०२६ रोजी प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा असल्याच्या संशयावरून करण्यात आलेल्या कारवाईत १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपये किंमतीचा साठा परांडा, ता. परांडा, जि. धाराशिव येथे जप्त करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

## अर्ध्या तासाचा प्रवास १० मिनिटांत होणार, सात वर्षांनंतर गोरेगावमधील पुलाचा विस्तार पूर्ण



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई: गोरेगावमधील मृणालताई गोरे उड्डाणपुलाच्या विस्ताराचे काम पूर्ण होऊन हा टप्पा शनिवारपासून वाहनचालकांसाठी खुला करण्यात आला. या पुलामुळे प्रवासाचा पूर्वीचा अर्ध्या तासाचा कालावधी आता १० मिनिटांवर येणार आहे. त्यामुळे वेळेसोबतच इंधनबचतही होणार आहे. या पुलाच्या विस्तारकामाचे लोकार्पण महापौर रितू तावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

हा उड्डाणपूल मुंबईकरांचा प्रवास अधिक सुखकर करण्यासाठी विस्तारीत करण्यात आला आहे. वेगवेगळी कारणे आणि आव्हाने यामुळे हे विस्तारीकरण काम लांबले. मात्र यापुढे कोणत्याही प्रकल्पाचे काम लांबणार नाही, याची दक्षता घ्यावी. एखादे काम लांबले, तरी कोणत्याही स्थितीत निविदेला मुदतवाढ किंवा प्रकल्पखर्च वाढ होऊ देणार नाही. ठरलेल्या किंमतीतच प्रकल्प पूर्ण करावा लागेल. जेणेकरून करदात्यांच्या पैशांचा नाहक अपव्यय होणार नाही,' अशा सक्त सूचना रितू तावडे यांनी दिल्या.

यावेळी उपमहापौर संजय घाडी, आमदार अमित साटम, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर, महापालिका पूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या उड्डाणपुलाचे संरेखन वालभट नदी आणि ओशिवरा नदीवरून जाते. ही दोन्ही ठिकाणे रस्त्याच्या समपातळीवर आहे. वालभट नदीवरील आणि ओशिवरा नदीवरील विद्यमान पुलाचे पाडकाम व पुनर्बांधणी करताना वाहतूक सुरू ठेवून कामकाज तीन टप्प्यांत पूर्ण करण्यात आले. अशा विविध आव्‍हानांवर मात करत महापालिकेच्‍या पूल विभागाने मृणालताई गोरे उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाचे काम यशस्‍वीपणे पूर्ण केले.

या प्रकल्पाचं काम मार्च २०१९ मध्ये सुरू झालं होतं. त्यापुढे २४ महिन्यात या पुलाचं काम पूर्ण होणं अपेक्षित होतं. पण अनेक कारणांमुळे हे काम रखडलं आणि तब्बल ७ वर्षांनंतर हा पूल सुरू झाला आहे. वालभट आणि ओशिवरा नदीवर हा पूल बांधण्यात आला आहे. दरम्यान, आदित्य ठाकरेंनी या पुलाच्या बांधकामाबद्दल एक्सवरीत टीका केली आहे. मार्गाच्या ओबडधोबड बांधकामावर आणि पुलाच्या खांबावर लावेल्या फलकांवर त्यांनी टीका केली आहे.

## राज्यात उष्माघाताचे २९२ रुग्ण; सहा जणांचा मृत्यू

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : राज्यात १ मार्च ते ५ जून या कालावधीत उष्माघाताचे एकूण २९२ रुग्ण नोंदविले गेले आहेत. शुक्रवारी दिवसभरात उष्माघाताचे दोन नवीन रुग्ण नोंदविण्यात आले असून, मृत्यूची कोणतीही नवीन घटना समोर आलेली नाही. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय असलेल्या १५ घटनांची नोंद करण्यात आली आहे. यापैकी सहा मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचे अधिकृतपणे निश्चित करण्यात आले आहे. उर्वरित प्रकरणांची तपासणी सुरू आहे.

उष्माघातामुळे झालेल्या सहा मृत्यूंपैकी लातूर जिल्ह्यात एक, अकोला जिल्ह्यात दोन, गडचिरोली जिल्ह्यात एक आणि जळगाव जिल्ह्यात दोन मृत्यूंची नोंद झाली आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा सातत्याने उच्चांक गाठत असल्याने, नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. दुपारच्या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळणे, भरपूर पाणी पिणे, सैल व हलक्या रंगाचे कपडे वापरणे, तसेच उष्णतेमुळे चक्कर येणे, अशक्तपणा, डोकेदुखी किंवा शरीराचे तापमान वाढणे अशी लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## एलपीजी गॅस सिलिंडरच्या काळाबाजाराचा पर्दाफाश, डीएननगर पोलिसांकडून काळाबाजार उघड



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : अंधेरी पश्चिमेतील एका गॅस एजन्सीमध्ये घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरमधील गॅस अवैधरीत्या लहान सिलिंडरमध्ये भरून विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार ५ जूनला उघडकीस आला आहे. डीएन नगर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने शुक्रवारी (दि. ५) मध्यरात्री छापा टाकून त्यावर कारवाई केली.

अंधेरी पश्चिम येथील न्यू लिंक रोड, शीतलादेवी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी परिसरात अरिहंत ट्रेडर्स' दुकानात विनापरवाना घरगुती वापराच्या १४.६ किलो क्षमतेच्या गॅस सिलिंडरमधील गॅस रेग्युलेटर व प्लॅस्टिक फिलिंग पाइपच्या साहाय्याने ४ किलो क्षमतेच्या रिकाम्या सिलिंडरमध्ये भरला जात होता. या प्रकारामुळे गॅसचा काळाबाजार होत असून, नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ५ जूनच्या पहाटे दुकानावर छापा टाकला. दुकान बंद असले तरी आतून गॅसचा वास व सिलिंडर हलविण्याचा आवाज येत असल्याने दुकानमालक वाडीलाल ओथी गड्डा (५७) यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. दुकान उघडल्यानंतर पोलिसांनी पाहणी केली असता समशुद्दीन जमाल खान (२३) हा मोठ्या सिलिंडरमधून लहान सिलिंडरमध्ये गॅस भरत असल्याचे आढळून आले. १४.६ किलोचे अनेक घरगुती गॅस सिलिंडर, ४ किलो क्षमतेचे शेकडो सिलिंडर, रेग्युलेटर आणि गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारे प्लॅस्टिक पाइप असा एकूण सुमारे १ लाख ७३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान समशुद्दीन याने दुकानमालक वाडीलाल गड्डा याच्या सांगण्यावरून हा व्यवसाय सुरू असल्याची कबुली दिली.

सिलिंडरचा साठा ठेवण्यासाठी किंवा एका सिलिंडरमधील गॅस दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरण्यासाठी कोणताही अधिकृत परवाना नसल्याचेही समोर आले. या प्रकरणी वाडीलाल आणि समशुद्दीन यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# स्टॅच्यु ऑफ युनिटी होऊ शकते पण महाराजांचे अरबी समुद्रातले भव्य स्मारक का होऊ शकत नाही ?

## शिवभक्त राजू देसाई यांचा खडा सवाल




जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : २०१६ साली मुंबईत अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य स्मारकासाठी मोठ्या थाटामाटात जलपूजन करण्यात आले. परंतु आज दहा वर्षे होऊनही हजारो कोटी रुपये खर्च करून हे भव्य स्मारक दृष्टीपथात येऊ शकत नाही. केवडिया येथे जगातील सर्वात उंच स्टॅच्यु ऑफ युनिटी होऊ शकते पण महाराजांचे भव्य स्मारक कां होऊ शकत नाही असा खडा सवाल शिवचरित्राचे गाढे अभ्यासक शिवभक्त राजू देसाई यांनी केला. हजारो कोटी रुपये घालवून हे समुद्रातले भव्य स्मारक करण्याऐवजी महाराजांच्या गड किल्ल्यांची डागडुजी करा, त्यांची दुरुस्ती करून संवर्धन करा, तीच खऱ्या अर्थाने महाराजांची स्मारके आहेत, असेही शिवभक्त राजू देसाई यांनी स्पष्टपणे सांगितले. सकाळी शिवभक्त राजू देसाई यांचा अभीष्टचिंतन सोहोळा मल्ल्या वराडकर फ्रेंड्स क्लब तर्फे साग्रसंगीतपणे दणक्यात साजरा झाला. मागाठाणे मित्र मंडळ संचालित कै प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय येथे काल रात्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजाभिषेकानिमित्त शिवचरित्राचे गाढे अभ्यासक शिवभक्त राजू देसाई आणि इतिहासाचे अभ्यासक हरीश पाटील यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवभक्त राजू देसाई यांनी मातीसाठी कसे जगायचे हे छत्रपती शिवाजी महाराज यांनी आणि मातीसाठी कसे बलिदान करायचे हे छत्रपती शंभूराजे यांनी दाखवून दिले असल्याचे नमूद केले. इतिहासाचे अभ्यासक हरीश पाटील यांनी विविध उदाहरणे देत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक नव्हे तर राजाभिषेक असा उल्लेख असल्याचे सांगितले. राजांवर अभिषेक करण्यात आला, राज्यावर नाही, म्हणून शिवराजाभिषेक म्हणणे हेच योग्य आहे असे स्पष्टपणे सांगितले. मागाठाणे मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार मोरे, वसंत सावंत, मनोज सनान्से, दिलीप देसाई, अभिलाष कोंडविलकर, वनिता दळवी, स्मिता डेरे, संजना वारंग आदींच्या शुभहस्ते व्याख्यात्यांना, पाहुण्यांना शाल, पुष्पगुच्छ, पुस्तक आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. योगायोगाने शिवभक्त राजू देसाई यांचा वाढदिवस असल्याने त्यांना मेघडंबरी असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य प्रतिमा भेट देऊन त्यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. सकाळी जॉगिंग पार्क, एक्सर, बोरीवली पश्चिम येथे मल्ल्या वराडकर फ्रेंड्स संस्थेतर्फे शिवभक्त राजू देसाई यांचा अभीष्टचिंतन सोहोळा दणक्यात साजरा करण्यात आला. रश्मी मुळे, चंद्रशेखर साळुंखे, परंजय त्रिवेदी, सुरेश साळवी आदींनी इतिहासकालीन तसेच हिंदी गाणी गायली तेंव्हा सत्तरी ओलांडलेल्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये जबरदस्त उत्साह संचारला होता. रवि मल्ल्या, शेखर वराडकर, शिरीष वराडकर, नरेश नेत्रावळकर, रमाकांत राणे, भूषण मुळे, सदाशिव मराठे, अविनाश तावडे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

□ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ संपादक –सिध्दार्थ संजय भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com